LIVE पार्श्वभूमी बीड पोर्टलसाठी
तालुका, शहर व गावनिहाय
प्रतिनिधी नेमणे आहे
संपर्क : दै.पार्श्वभूमी कार्यालय, भाजी मंडई, बीड.
संपादक गंमत भंडारी 9422295333 8623880100

# पार्श्वभूमी

रियांश एन्टरप्राईजेस
नामांकित कंपनीचे LED टी.व्ही.
50% पर्यंतच्या सवलती दरात मिळतील
पत्ता : शॉप नं.92 व 93 सारडा सेंट्रल, डी.पी.रोड, बीड.
Mob.9511511818

बीड वर्ष ३६ वे अंक ७९ वा फोन २३०१०१ दिनांक १६ फेब्रुवारी २०२६ सोमवार | गंमत भंडारी | ई-पेपर : www.parshvbhumi.com | Reg.No.L/85/RNP/Beed/2020-22 RNI Regd.no. MAHMAR/1990/501 | पाने ६ किंमत ४रु.

## एस.पी.साहेब, तुमच्या डोक्याला ३ महिने ताण होणार, पोलिसी भाषेत भोपळेंना बोलावून घ्या

# बार्शी नाक्यावर इंजि.भोपळेंच्या आडमुठेपणामुळे ५ रोडवरची ट्रॅफीक ३-३ तास जॅम, जनतेचे हाल

बीड दि.१५ (प्रतिनिधी):- विकास कामे झाली पाहिजेत, ती आवश्यक आहेत मात्र त्यासाठी जनतेला वेठीस धरणे कितपत योग्य आहे. मोठमोठ्या शहरात अति वर्दळीच्या रस्त्यावर कामे चालू असतात, पण वाहतुक मात्र सुरळीत असते. बीडच्या बार्शी नाक्यावर सुरु असलेल्या रस्त्याच्या कामामुळे या भागाला जोडणाऱ्या ५-५ रस्त्यांवरील वाहतुक दररोज ३ ते ४ तास जॅम असते. या सर्व प्रकाराला या रस्त्याच्या कामासाठी नेमलेले इंजिनीअर भोपळे जबाबदार आहेत. एकीकडे रस्ता खांदून ठेवला तर दुसरीकडे रस्ता बाजुने काढून देण्याची जबाबदारी इंजिनीअरची आहे. बाजुला मोठा रस्ता आहे, जागा आहे, थोडी साफसफाई केली तर कच्च्या रस्त्यावरुन वाहतुक सुरळीत होऊ शकते. अजुन तीन महिने हे काम पूर्ण होत नाही, तो पर्यंत नागरिकांना हा ताण सहन करावा लागणार आहे. पोलीस अधीक्षकांनी या प्रकरणी वैयक्तिक लक्ष घालून भोपळेंना तातडीने बोलावून घेऊन समज देण्याची गरज आहे. कारण या पाचही रस्त्यावरुन ये-जा करणाऱ्या जनतेचे प्रचंड हाल होत आहेत.





## वाह रे ऽ इंजिनीअर, यांच्यापेक्षा मिस्तरी काम करणारे बरे

एखादं काम सुरु करायचं झालं त्यासाठी सर्व साहित्य सोबत असणे किंवा साईटवर असणे आवश्यक आहे. बार्शी नाक्यावरील रोडचे काम सुरु आहे, त्या ठिकाणी ना काम सुरु असल्याचा बोर्ड आहे ना ड्रायव्हर्शन दाखविणारे फलक आहेत. पुण्या, मुंबईत किंवा इतर शहरांमध्ये रोडचे काम करतांना त्याच्या बाजुने पत्रे लावले जातात. पत्रे नाहीच भेटले तर किमान ग्रीन कलरची जाळी लावण्यात येते. वर्क प्रोग्रेस असं लिहिलेल्या पट्टया लावल्या जातात. मात्र बार्शी नाक्यावरच्या रोड कामाच्या ठिकाणी असं काहीच दिसत नाही. इंजिनीअर भोपळेंच्या निगराणीखाली हे काम सुरु आहे. मग त्या ठिकाणी पान २ वर

**नियोजन काहीच नाही; दररोजच्या ट्रॅफीकचे काय?**

## एस.पी.साहेब, तुमचा एक कर्मचारी तिथे पाठवा आणि रिपोर्ट घ्या



एखादा व्यक्ती किंवा दुचाकी, चारचाकी बार्शी नाक्यावरील ट्रॅफीकमध्ये अडकल्या नंतर काय सि होतो हे ज्याचे त्यालाच माहित आहे. ३-३ ट्रॅफीक हटत नाही, तुमचे पोलीसवाले तिथे असतात परंतु ते सुद्धा २४ तास कसे थांबणार? अशीच परिस्थिती राहिल्यास ३ महिने याचा ताण तुम्हाला होणार आहे. एस.पी.साहेब, तुम्ही स्वत:चा तुमचा एक पोलीस कर्मचारी बार्शी नाक्यावर पाठवा, तिथे काय परिस्थिती आहे, रोडच्या बाजुला दगडांचे ढिगारे कसे आहेत, लोकांनी कसं अतिक्रमण केलं आहे. तिथल्या एखाद्या दुकानाच्या कार्यक्रमासाठी रोडवर मंडप टाकला जातो, हे सर्व जाणून घेण्यासाठी कर्मचाऱ्यामार्फत रिपोर्ट घ्या म्हणजे तिथलं दु:ख आणि लोकांचे हाल कसे होत आहेत हे तुमच्या लक्षात येईल. त्यामुळे ही ट्रॅफीक दूर करण्यासाठी योग्य नियोजन करायला लावा, जो कोणी गुत्तेदार असेल त्याला त्याचे खाजगी सुरक्षा गार्ड नियुक्त करायला लावा.

## कामाची क्वॉलिटी चांगली

बार्शी नाक्यावरील रोडचे काम क्वॉलिटीचेच केले जात आहे. क्वॉलिटीच्या बाबतीत इंजि.भोपळेंनी कुठेही तडजोड केलेली नाही. रोड जिथे करायचा आहे तिथे १ मीटर पर्यंत खोदले आहे. कॉम्पेक्शन चांगल्या प्रकारे केले जात आहे. सिमेंट, लोखंड हे देखील चांगल्या दर्जाचे वापरले जात आहे. क्वॉलिटीच्या बाबतीत दुमत नाही, परंतु नियोजन ढासळल्याचे दिसून येत आहे. त्याचा परिणाम बार्शी नाका परिसरातीलच नव्हे तर इमामपूर रोड, मोमीनपुऱ्यातून येणारा रोड, तेलगाव नाक्याकडे जाणारा रोड, मांजरसुंब्याकडे जाणारा रोड पान २ वर

## रोडच्या एका बाजुचे दगडं उचलली तर एकाच वेळी चार गाड्या जातील

बार्शी नाक्याकडून बस स्टॅण्डकडे येणाऱ्या रोडची एक बाजु हिना पेट्रोल पंपापर्यंत खोदून ठेवण्यात आली आहे. दुसऱ्या म्हणजे समोरच्याच रोडच्या बाजुला अनेक गाड्या कितीतरी दिवसांपासून धूळखात उभ्या आहेत. जवळच दगडांचे ढीग साचले आहेत, कसलीच साफसफाई केलेली नाही. तेथील दुकानदारांनी आपल्या दुकानांचे बोर्ड रोडवरच ठेवले आहेत त्यांच्याकडे येणाऱ्या ग्राहकांच्या दुचाकी, चार चाकी देखील त्याच रोडवर उभ्या असतात. त्यामुळे ट्रॅफीक आणखीनच जॅम होत आहे. रोडच्या एका बाजुची दगडं उचलली, कितीतरी महिन्यांपासून धूळखात उभ्या असलेल्या गाड्या पान २ वर




बीडच्या बार्शी नाक्यावर सध्या रस्त्याचे काम चालू आहे. या चौकामध्ये गेल्या ८ दिवसांपासून मोठ्या प्रमाणावर ट्रॅफीक जॅम होत आहे. पोलीस जरी असले तरी रस्ताच नसल्यामुळे ट्रॅफीक तासन्तास ठप्प असते. नागरिक अक्षरश: वैतागले आहेत. या भागात तेलगाववरुन येणारा रस्ता, इमामपुर रस्ता, मोमीनपुऱ्यातून येणारा रस्ता, गावातून येणारा रस्ता, चौसाळ्याकडून येणारा रस्ता अशा ५ रस्त्यांवरुन वाहतुकीची ये-जा असते. रस्त्याचे काम तर करावेच लागणार आहे परंतु हे करत असतांना बाजुचा कच्चा रस्ता व्यवस्थीत करुन जेसीबीने त्याची लेव्हल करुन वाहतुक सुरळीत करणे गरजेचे आहे. या रस्त्यावर मोठमोठे दगडे पडलेले आहेत ते काढून घेतले तर वाहतुकीला अडथळे होणार नाहीत. एखाद्या ठिकाणी काम चालू असतांना जे सुरक्षेचे उपाय केले जातात ज्यात काम चालू असलेल्या ठिकाणी पत्रे लावणे, रेडियमच्या पट्टया लावणे असे कुठलेही सेफ्टी मेजर घेतलेले दिसून येत नाहीत. अजुन तीन ते पान २ वर

## खासदार, आमदार, नगराध्यक्ष काय करु लागले?

बीड शहरातील बार्शी नाक्यावरील रोडच्या कामामुळे दररोज तीन तीन तास ट्रॅफीक जॅम होत आहे. जिथे काम सुरु आहे तिथल्याच पर्यायी रोडचे कसलेच नियोजन केलेले नाही. बीड शहरातीलच नव्हे तर जिल्हाभरातून येणाऱ्या वाहनधारकांचे प्रचंड हाल होत असून तीन-तीन तास गाड्या ट्रॅफीकमध्ये अडकत आहेत. एवढा मोठा गंभीर प्रश्न निर्माण झालेला असतांना बीडचे खासदार, आमदार आणि नगराध्यक्ष नेमके काय करु लागले? प्रशासनाला आणि संबंधीत इंजिनीअरला बोलून त्यांना हे नियोजन लावता येऊ शकते. शहराच्या हद्दीत एवढे मोठे काम सुरु असतांनाही नगराध्यक्षांचे याकडे दुर्लक्ष का? त्यांनी त्यांची यंत्रणा आणि पथक सोबत दिल्यास ही अडचण होणार नाही.

### एकच लाल सेवालाल

## बीडमध्ये संत सेवालाल महाराज यांची जयंती जल्लोषात साजरी



बीड दि.१५ (प्रतिनिधी):- जिल्ह्यातील विविध सामाजिक संस्था, शाळा आणि महाविद्यालयांमध्ये संत सेवालाल महाराज यांची २८७वी जयंती उत्साहात आणि भक्तिभावाने साजरी करण्यात आली. सर्वत्र धार्मिक, सांस्कृतिक आणि सामाजिक उपक्रमांचे आयोजन करून समाजबांधवांनी आपल्या श्रद्धेची प्रचिती दिली. शहरातील संत श्री सेवालाल महाराज चौक येथे रविवारी (ता.१५) सकाळी ९ वाजता मुख्य कार्यक्रम पार पडला. शहरासह तालुक्यातील बंजारा समाजबांधव मोठ्या संख्येने एकत्रित आले होते. पारंपरिक बंजारा पद्धतीने भोग अर्पण करून संतांच्या प्रतिमेचे विधिवत पूजन करण्यात आले. ढोल-ताशांच्या गजरात पान २ वर

### उघड्या डीपी जिवावर उठल्या; महावितरणचे अधिकारी मात्र गुत्तेदार पोसण्यातच मग्न

## बीडमध्ये डीपीला चिटकल्याने मुलाचा मृत्यू



संग्रहीत छायाचित्र

बीड दि.१५ (प्रतिनिधी):- शहरातील गोरे वस्ती येथील उघड्या डीपीला चिटकल्याने शॉक बसून एका १५ वर्षीय मुलाचा जागीच मृत्यू झाल्याची दुर्दैवी घटना रविवारी घडली. या घटनेने सर्वत्र हळहळ व्यक्त होत असून महावितरणच्या अशा बेजबाबदार कारभारा विरुद्ध संताप व्यक्त होऊ लागला आहे. दरम्यान बीड शहरात अशा उघड्या डीपी ठिकठिकाणी असून त्याच्या देखभाल दृष्टीकडे लक्ष देण्याऐवजी महावितरणचे अधिकारी मात्र गुत्तेदार पोसण्यातच मग्न असल्याचे दिसून येते.

बीड शहरातील गोरे वस्ती येथील शेख आवेज शेख परवेज (वय १५) या मुलाचा तेथील उघड्या डीपीला चिटकून शॉक लागल्याने मृत्यू झाला. सदरील घटनेची माहिती तेथील नागरिकांनी संबंधीत पान २ वर

## माजलगाव नगर परिषदेत नगरसेवकांचा गोंधळ

### जनतेचा विश्वासघात!

- निधी हडपण्यासाठी नेत्यांनीही नीतिमत्ता गुंडाळली
- नगराध्यक्षांसह सर्व नगरसेवकांचे पद रद्द करून प्रशासक नेमावा

-सय्यद सलीमबापू






सलीम बापु

माजलगाव दि.१५ (प्रतिनिधी):- माजलगाव नगरपरिषद सध्या प्रचंड गोंधळ, राजकीय संघर्ष, चित्रविचित्र आघाड्या, युत्या आणि गंभीर आरोपांच्या भोवऱ्यात सापडली आहे. शहरातील मूलभूत प्रश्न सुटण्याऐवजी सत्ताधारी कोण? आणि विरोधक कोण? काहीच कळायला मार्ग राहिला नसुन येथे आरोप-प्रत्यारोप, गटबाजी आणि राजकीय कुरघोड्या वाढल्या आहेत. त्याचा थेट फटका सर्वसामान्य नागरिकांना बसत आहे. दरम्यान निधी हडपण्यासाठी येथील सर्वच नेत्यांनी नीतिमत्ता गुंडाळली आहे. तर लोकांनी निवडून दिलेल्या नगराध्यक्ष, नगरसेवकांनी जनतेचा विश्वासघात केला आहे. त्यामुळे सर्व पदाधिकाऱ्यांचे पद रद्द करून नगर परिषदेत प्रशासक नेमावा अशी मागणी सय्यद सलीमबापू यांनी केली आहे. प्रदीर्घकाळ प्रशासकीय काळात झालेल्या भ्रष्ट कारभारला कंटाळल्यानंतर मतदारांनी नगर परिषद महाविकास पान २ वर

## व्यवसायकर वेळेत भरावा अन्यथा व्याज व दंडात्मक कार्यवाही

### अपर राज्यकर आयुक्त अभिजित राऊत (भा.प्र.से.)

बीड दि.१५ (प्रतिनिधी):- व्यापाऱ्यांनी त्यांच्याकडील प्रलंबित व्यवसाय कराच्या देय रक्कमेचा भरणा व्याज व फीसह करुन शासन महसूल वाढीस मदत करावी आणि व्याज व दंडात्मक कार्यवाही टाळावी, असे आवाहन छत्रपती संभाजीनगर जीएसटी परिक्षेत्राचे अपर राज्यकर आयुक्त अभिजित राऊत (भा.प्र.से.) यांनी केले आहे. महाराष्ट्र राज्य व्यवसाय, व्यापार, आजीविका आणि नोकरीवरील कर कायदा १९७५ च्या कलम ८ अन्वये व्यवसाय कर कायदयाखाली नोंदीत व नाव नोंदणी असलेल्या व्यापाऱ्याने विवरण पत्रानुसार पान २ वर

भारतातील सुप्रसिद्ध sancheti HOSPITAL
संचेती इन्स्टिट्यूट फॉर ऑर्थोपेडीक्स अ‍ॅण्ड रिहॅबीलीटेशन (पुणे)
ऑर्थोपेडीक व स्पाईन सुपर स्पेशालिटी क्लिनिक
तज्ज्ञ डॉक्टर रुग्णांची तपासणी करतील
बाह्य रुग्ण सेवा (OPD) आपल्या बीड शहरात
आपल्याला खालील लक्षणे आहेत का?
- पाठदुखी, कंबरदुखी, गुडघ्यामध्ये तीव्र वेदना.
- पाठीखालील भाग बधिरता व मुंग्या जाणवणे.
- सांधेदुखी, गुडघेदुखी, सांधे प्रत्यारोपण, संधिवात व सर्व हाडांचे आजार
दीप हॉस्पीटल
मंगळवार दि.१७ फेब्रुवारी २०२६ सकाळी ११ ते दु.४ पर्यंत
: अपॉइंटमेंट व अधिक माहितीसाठी :
: संपर्क :
8888849648 9518306798

स्टोअर ऑफीसर पाहिजे
टॅली सॉफ्टवेअर, स्टोअर अनुभवी असलेल्या उमेदवारास प्राधान्य दिले जाईल
पगार - 18 हजार ते 25 हजार
:: संपर्क ::
विक्की मोटार्स
जालना रोड, बीड.
9326685085

त्वरीत पाहिजे
पूर्ण वेळ अकाऊंटंट
कामाची वेळ :
सकाळी १०.३० ते सायं.६ पर्यंत
शिक्षण : बी.कॉम.
ERP/excel & expert in online work
विकी मोटार्स
जालना रोड, बीड.
Mob.9326685085

## महाशिवरात्रीदिवशी कत्तलीसाठी जाणाऱ्या ७ गाईंची पोलिसांनी केली सुटका



### एक गजाआड, ६ लाखांचा मुद्देमाल जप्त

बीड दि.१५ (प्रतिनिधी):- महाशिवरात्रीच्या पवित्र दिवशी पोलिसांनी सात गायी कत्तलीसाठी नेण्याच्या प्रयत्नात असलेल्या पिकअपवर कारवाई करून त्यांना सुरक्षित हाती घेतले. उपअधीक्षक पूजा पवार यांच्या मार्गदर्शनाखाली ही कारवाई केली. यामध्ये एकाविरुद्ध गुन्हा दाखल करत एकूण लाखांचा मुद्देमाल पोलिसांच्या जप्त करण्यात आला आहे.

उपअधीक्षक पूजा पवार यांना गुप्त माहिती मिळाली की तेलगाव नका येथून गायींची अवैध वाहतूक होणार आहे. पान २ वर

## श्री बंकटस्वामी महाविद्यालयात संत सेवालाल महाराज जयंती साजरी

बीड दि १५ (प्रतिनिधी )- येथील श्री बंकटस्वामी महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने रविवार १५ फेब्रुवारी रोजी संत सेवालाल महाराज यांची जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली.या कार्यक्रमाच्या प्रारंभी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.शंकर धांडे तसेच प्रमुख वक्ते प्रा.एच.एन.सोट यांनी संत सेवालाल महाराज यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले.यावेळी प्रमुख वक्ते प्रा.एच.एन.सोट यांनी आपल्या भाषणात संत सेवालाल महाराज यांच्या सामाजिक कार्याचा सविस्तर आढावा घेतला.

# पार्श्वभूमी

## मृतदेहाची ओळख पटविण्याचे गेवराई पोलिसांचे आवाहन



गेवराई दि.१५( प्रतिनिधी):- तालुक्यातील पाडळसिंगी टोलनाका येथे रविवार दि.०८ फेब्रुवारी २०२६ रोजी सायंकाळी एक तरुण मृत अवस्थेत मिळून आला आहे. सदर इसमास कोणी ओळखीत असेल तर पोलीस ठाणे गेवराई येथे ०२४४७- २६२१०० मो.९३२५१३१३१२ या क्रमांकावर संपर्क साधावा असे आवाहन गेवराई पोलिसांच्या वतीने करण्यात आले आहे.



## जिल्हा परिषद प्राथमिक शाळा उंदरी येथे शैक्षणिक पालक सभा व आनंदनगरी संपन्न

अंबाजोगाई दि १५ (प्रतिनिधी)- केज तालुक्यातील उंदरी येथे जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत शैक्षणिक पालक सभा व आनंद नगरी कार्यक्रम उत्साहात संपन्न झाला.

या कार्यक्रमासाठी अध्यक्ष म्हणून गावच्या सरपंच सौ. अश्विनीताई ठोंबरे तसेच प्रमुख अतिथी होळ केंद्राचे केंद्रप्रमुख संजय चवरे, बनसारोळा केंद्राचे केंद्रप्रमुख अर्जुन बोराडे , होळ केंद्राचे केंद्रीय मुख्याध्यापक बाळासाहेब चव्हाण, उंदरी गावचे उपसरपंच सोनवणे, शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष हर्षल ठोंबरे, विठ्ठल शिक्षण संस्थेचे अध्यक्ष माऊली बाप्पा ठोंबरे, सुदामदादा पाटील (माजी पंचायत समिती सदस्य केज) राहुल शिंदे ग्रामपंचायत चे सर्व सदस्य, सेवा सहकारी सोसायटीची सर्व सदस्य, गावातील सर्व प्रतिष्ठित नागरिक, अंगणवाडी कर्मचारी, शाळेतील सर्व विद्यार्थी सर्व शिक्षक उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शाळेचे मुख्याध्यापक राहुल खंदारे सर यांनी केले. कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन श्रीमती दळवी मॅडम यांनी केले. कार्यक्रम अतिशय उत्साहात संपन्न झाला सर्व पालकांनी आनंदनगरीचा आस्वाद घेतला. कार्यक्रम चांगला झाल्याबद्दल गावातील नागरिकांनी समाधान व्यक्त केले.

## रेणुका देवी माळावरील सभागृहासाठी आ .धस यांचेकडे आमदार निधीतून मदतीची मागणी

पाटोदा दि १५ (प्रतिनिधी)- आमदार सुरेश धस यांनी शनिवार दि. १४ फेब्रुवारी रोजी पाटोदा नगरपंचायत कार्यालयात नागरिकांच्या भेटीगाठी घेतल्या. यावेळी पाटोदा शहरातील रेणुका देवी माळावरील रेणुका माता मंदिर, पाटोदा संस्थान विश्वस्त मंडळाने त्यांची भेट घेऊन मंदिर परिसरात सभागृह उभारणीसाठी आमदार निधीतून आर्थिक सहाय्य देण्याची विनंती केली.सध्या मंदिर परिसरात छत्रपती संभाजीनगर येथील भक्त सतीश वैद्य यांच्या वैयक्तिक खर्चातून स्लॅबचे काम सुरू असल्याची माहिती विश्वस्तांनी दिली. भाविकांच्या वाढत्या संख्येच्या पार्श्वभूमीवर मंदिर परिसरात सभागृहाची मागणी केली यावेळी संस्थानचे सचिव पत्रकार ॲड. महेश बेदरे, कोषाध्यक्ष संपत मुळे, सहसचिव संतोष नाईकनवरे, सदस्य सचिन गाडेकर यांच्यासह राऊत वस्ती व मुळे वस्ती शिवारातील सुभाष गुंड, बापूराव भवर तसेच भाविक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

सभागृह उभारणीसंदर्भात आवश्यक प्रस्ताव सादर करण्याचे निर्देश आमदार धस यांनी संबंधितांना दिल्याची माहिती विश्वस्त मंडळाच्या वतीने देण्यात आली.

# उत्तरेश्वर पिंपरीत महाशिवरात्रीला श्री उत्तरेश्वराचे लाखोच्या संख्येने भाविकांनी घेतले रांगेत दर्शन

चिंचोली माळी दि १५(प्रतिनिधी)- पौराणिक महत्त्व असलेल्या केज तालुक्यातील व येथून जवळ असलेल्या श्री क्षेत्र उत्तरेश्वर पिंपरी अर्थात हनुमान पिंपरी येथे महाशिवरात्रीनिमित्त उत्तरेश्वराच्या दर्शनासाठी पहाटेपासून भाविकांच्यारांगा लागल्या होत्या .लाखो भाविकांनी उत्तरेश्वराचे दर्शन घेतले. तर भरलेल्या यात्रेत गृहिणींनी संसार उपयोगी वस्तूची खरेदी करण्यासाठी झुंबड उडवली तर किशोर व तरुण वर्गाने विविध प्रकारचे मेळे मधील आनंद लुटण्यासाठी गर्दी केली. महाशिवरात्रीचा उपवास प्रत्येक कुटुंबातील जवळपास सर्वांनाच असल्याने यात्रेकरूंनी मात्र गोड पदार्थाकडे पाठ फिरवल्याने पहिल्या दिवशी मिठाईचे दुकान वाल्यांना ग्राहकांची प्रतीक्षा करण्याची वेळ आली. दरम्यान महाशिवरात्रीनिमित्त आयोजित केलेल्या धार्मिक कार्यक्रमांना तेवढेच गर्दी असल्याचे चित्र पाहायला मिळाले.

यासंदर्भात माहिती अशी की बीड जिल्ह्यात परळी वैजनाथ इतकेच महत्त्वाचे पौराणिक क्षेत्र म्हणून उत्तरेश्वर पिंपरी अर्थात हनुमान पिंपरी येथे दरवर्षी महाशिवरात्रीनिमित्त मोठी यात्रा भरते.वै. ह भ प ज्ञानेश्वर माऊली महाराज यांचे या गावात काही वर्ष वास्तव्य असल्याने अख्या महाराष्ट्रातून त्यांचा भक्तगण महाशिवरात्रीला येतो. तीच परंपरा आज देखील चालू आहे .श्री उत्तरेश्वर पिंपरी येथील उत्रेश्वराचे दर्शन करून माऊलींच्या दर्शनासाठी श्रीक्षेत्र







चाकरवाडीला भाविक मोठ्या संख्येने जातात. दरम्यान महाशिवरात्रीनिमित्त श्री उत्तरेश्वराच्या दर्शनासाठी पहाटेपासून भाविकांच्या रांगा लागल्या होत्या. देऊळ कमिटीच्या वतीने व केज पोलीस ठाण्याच्या वतीने भाविकासाठी चोख बंदोबस्त ठेवला. पोलीस आणि होमगार्ड यांनी ठिकठिकाणी रावळासह यात्रेच्या ठिकाणी खडा पहारा दिला होता. सोबतिला सीसीटीव्ही कॅमेरे देखील लावण्यात आले होते. एसटी महामंडळाच्या वतीने बस गाड्या मोठ्या प्रमाणात सोडल्याने एसटी बसची प्रतीक्षा करण्याची वेळ भाविक मंडळी यात्रेकरूवर आली नाही. दरम्यान महाशिवरात्रीनिमित्त प्रत्येक घरात जवळपास सर्वांनाच महाशिवरात्रीचा उपवास असल्याने यात्रे करूनी उपवसाचे पदार्थ खरेदी करण्यावर भर दिल्याचे दिसून येत होते. तर मिठाईचे पदार्थ खरेदी करण्यासाठी ग्राहकच नसल्याने मिठाईची दुकाने लावणाऱ्यांना ग्राहकांची प्रतीक्षा करण्याची वेळ आली. उद्या कसल्याही प्रकारचा उपास नसल्याने तसेच दोन अमावस्या आल्याने ही यात्रा तीन दिवस भरणार आहे शेवटचे दोन दिवस मिठाईवाल्यांचे दुकाने गजबजून जातील असे एका मिठाईवाल्याने प्रतिनिधीशी बोलताना सांगितले

दरम्यान या यात्रेत महिलांनी लहान मुलांची खेळणी खरेदी करण्यासाठी व संसार उपयोगी साहित्य खरेदीसाठी ज्या-त्या दुकानावर मोठी गर्दी केल्याचे चित्र पाहायला मिळाले.

## चालत्या कारने पेट घेतल्याने मोठे नुकसान

लिंबागणेश दि १५ (प्रतिनिधी) -बोरखेड येथील शेतात बोरवेल च गाडी आल्याने रविवारच्या पहाटे सहाच्या घुमारास बीड तालुक्यातील लिंबागणेश येथील डॉ. भारत मेंगडे व डॉ. प्रतिभा मेंगडे हे एम एच २३ वाय २३२१ विस्टा इंडिका कार मधून जात असताना कार मधून अचानक धोरणे होऊ लागल्याने त्यांनी गाडी उभी केली पण काही क्षणातच कारणी पेठ घेतला प्रसंगावधान राखून दोघेही बाहेर पडल्याने त्यांना कसली सीजा झाली नाही मात्र गाडीने पूर्ण पेठ घेऊन ती खाक झाली सदरची आग इंजिन मधील वायरच्या शॉर्टसर्किटमुळे लागली असल्याचा अंदाज व्यक्त केला जात आहे

घटनेची माहिती मिळताच डॉ. गणेश ढवळे, विक्रांत वाणी, सय्यद अख्तर, सुमित मुळे यांनी तातडीने घटनास्थळी धाव घेत मदतकार्य सुरू केले. तसेच महाजनवाडीचे सरपंच विश्वंभर गिरी यांच्यासह शिवाजी घरत, सतीश घरत, ऋषिकेश घरत, अभिषेक घरत व अक्षय घरत यांनी आग विझविण्यासाठी प्रयत्न केले.सुदैवाने या घटनेत कोणतीही



जीवितहानी झाली नाही; मात्र वाहनाचे मोठे नुकसान झाले. अचानक घडलेल्या प्रकारामुळे परिसरात चर्चा होऊ लागली आहे.

## पत्रकार अशोक काळकुटेवरील खोट्या गुन्ह्याची चौकशी करून दोषीवर कारवाई करण्याची मागणी

कवडगाव बु. दि १५ (प्रतिनिधी)-पत्रकार अशोक काळकुटे यांच्यावर झालेल्या खोट्या गुन्ह्याची चौकशी करून यातील दोषी पोलिस अधिकारी, कर्मचारी यांच्यावर कारवाई करावी अशा मागणीचे निवेदन महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ मुंबई वडवणी तालुक्याच्या वतीने यासाठी राज्याचे मुख्यमंत्री तथा गृहमंत्री देवेंद्र फडणविस, पोलीस अधीक्षक बीड यांना ओढणी पोलीस निरीक्षक यांच्यावतीने पाठविण्यात आले आहेत.

महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ मुंबई बीड जिल्हा,वडवणी तालुका यांच्या वतीने संस्थापक अध्यक्ष तथा राज्य संघटक संजय भोकरे , प्रदेशाध्यक्ष गोविंद वाकडे, डिजिटल मीडिया प्रदेशाध्यक्ष सिद्धार्थ भोकरे , प्रदेश सरचिटणीस डॉ. विश्वासराव आरोटे, प्रदेश संपर्कप्रमुख वैभव स्वामी सर, मराठवाडा अध्यक्ष अनिल सावंत यांच्या मार्गदर्शनाखाली दिलेल्या निवेदनात या प्रकरणाची चौकशी करून यातील दोषी पोलीस अधिकारी कर्मचाऱ्यावर कारवाई करण्यात यावी अशी मागणी , पोलीस निरीक्षक वडवणी यांना दिलेल्या लेखी निवेदनाद्वारे करण्यात आली यावेळी बीड जिल्हा अँड.अध्यक्ष विनायक जाधव, वडवणी तालुका अध्यक्ष अशोकराव निपटे, गदरचे संपादक ज्ञानेश्वर लंगे,डिजिटल मिडिया वडवणी तालुका अध्यक्ष सतिषराव मुजमुले, तालुका सचिव अर्जुन मुंडे, पत्रकार प्रा. श्रीनिवास काकडे, पत्रकार विष्णू डोईफोडे सर, पत्रकार एजाज शेख, पत्रकार नाराणराव जाधव, पत्रकार शांतिनाथ जैन, पत्रकार अंकुश पवार, यासह इतर उपस्थित होते.

## बीएसएनएलला नेटवर्कच राहत नसल्याने विडा,सारणी सांगवीचे मोबाईल वापरकर्ते त्रस्त- बाजीराव ढाकणे

केज दि १५ (प्रतिनिधी) केज तालुक्यातील मौजे जोला व पंचक्रोशीतील



बी एस एन एल मोबाईल नेटवर्क सेवा गेल्या काही महिन्यापासून वारंवार खंडित होत असल्याने नागरिकांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. याकडे बीएसएनएलन लक्ष द्यावे असे आवाहन बाजीराव ढाकणे यांनी केले आहे. तालुक्यातीलविडा आणि सारणी (सांगवी) या दोन्ही ठिकाणी बी एस एन एल चे टॉवर असुन दोन्ही ठिकाणचे बी एस एन एल चे टॉवर दोन- दोन दिवस नेटवर्क रेंज पूर्णपणे बंद पडणे, नेटवर्क दिसत असतानाही इंटरनेट बंद पडणे, कॉल न लागणे व कॉल ड्रॉप होणे यासारख्या गंभीर तांत्रिक समस्यांमुळे ग्रामस्थांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे.

या समस्येचा सर्वाधिक फटका विद्यार्थ्यांच्या ऑनलाईन शिक्षणाला, बँक व डिजिटल व्यवहारांना, व्यापारी उलाढालींना तसेच आरोग्य व शासकीय सेवांना बसत आहे. इंटरनेट सेवा ठप्प झाल्याने ऑनलाईन पेमेंट, पैसे ट्रान्सफर व सरकारी पोर्टलवरील कामे ठप्प झाल्याचे नागरिकांनी सांगितले. तरी बी एस एन एल कंपनीने तातडीने नेटवर्क सेवा सुरळीत करावी, कायमस्वरूपी उपाययोजना राबवाव्यात व तांत्रिक अडचणी दूर कराव्यात अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते बाजीराव ढाकणे यांनी केली आहे.

## घरा घरात शिवसेना पोहचवण्याचे ना.संजय सिरसाट यांचे आवाहन

केज दि १५ (प्रतिनिधी)-शिवसैनिकांनी पुढाकार घेत घराघरात शिवसेना पोहोचली पाहिजे असे आवाहन करत केज येथील छत्रपती शिवाजी महाराजा स्मारकासाठी दोन कोटी सांगितले देत असल्याचे स्पष्ट केले.शिवसेनेच्या वतीने केज येथ कार्यकर्त्यांचा भव्य संवाद मेळावा व पक्षप्रवेश सोहळा शुक्रवार दि.१३ फेब्रुवारी २०२६ रोजी दुपारी २ वाजता मुक्ताई लॉन्स, केज येथे उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाला. या मेळाव्यास महाराष्ट्राचे सामाजिक न्याय मंत्री संजय शिरसाट बोलत होते . माजी आमदार प्रा संगीता ठोंबरे यांनी या अगोदर प्रश्न मांडले होते यामध्ये निवेदनात स्मारक परिसराची झालेली पडझड, आवश्यक सुविधांचा अभाव, तसेच शहराच्या ऐतिहासिक व सांस्कृतिक भावनांशी निगडित असलेले महत्त्व यांचा सविस्तर उल्लेख करण्यात आला होता. या पाठपुराव्याची दखल घेत सामाजिक न्याय मंत्री संजय शिरसाट यांनी राज्य शासनाच्या वतीने केज येथील छत्रपती शिवाजी महाराज स्मारकाच्या सुशोभीकरणासाठी २ कोटी रुपयांचा निधी मंजूर करण्यात येत आहे. तसेच लवकरच अधिकृत मंजुरी पत्रही निर्गमित होणार असल्याचीमाहिती त्यांनी दिली.यावेळी अनेकांनी शिवसेनेत प्रवेश केला यावेळी संग्राम केंद्रे यांना युवा सेनेचे उप जिल्हा प्रमुखपदी निवड करून केज विधानसभा मतदार संघाची जबाबदारी दिली आहे.

## बेडूकवाडी शाळेचे वार्षिक स्नेहसंमेलन उत्साहात संपन्न

बीड दि १५(प्रतिनिधी)- जि.प.प्रा.शाळा बेडूकवाडी केंद्र नाथापूर शाळेचे वार्षिक स्नेहसंमेलन दि. १३ फेब्रुवारी २०२६ रोजी सायंकाळी ६ वा. उत्साहाच्या वातावरणात संपन्न झाले. कार्यक्रमाची सुरूवात पाहूण्यांच्या हस्ते प्रतिमा पुजन व दीपप्रज्वलनाने झाली. कार्यक्रमाचे पस्ताविक मुख्याध्यापिका श्रीमती भुमकर मॅडम यांनी केले. या कार्यक्रमासाठी प्रमुख पाहूणे सुनिल अप्पा पाटील, परमेश्वर सातपुते, पिंपळनेर पोलीस स्टेशनचे सपोनि गर्जे , केंद्र प्रमुख गोविंद सारडा, प्रा. प्रल्हाद इंगोले, मारूती जाधव, बाळासाहेब कदम, दिपक पवार, कास्टेबल देवकते, विठ्ठल चिंचकर, मनिषा चिंचकर व उपाध्यक्ष बळीराम आदमाने व सर्व सदस्य उपस्थित होते. यावेळी विद्यार्थ्यांनी शेतकरी गीत, भक्ती गीत, चित्रपट गीते, लघु नाटीका, विनोदी नाटीका असे बहारदार गितावर आपली कला सादर केली.

कार्यक्रमासाठी नविन विद्यालय लिंबारूचे प्राचार्य



कालीदासजी थोटे, जि.प. शाळेचे शिक्षक नामदेव फुलझळके, लक्ष्मीकांत खडकीकर सर, वाघमारे सर तसेच पंचक्रोशीतील ग्रामस्थ उपस्थित होते. आपलेल्या पाहूणे, पालक व ग्रामस्थ यांनी चिमुकल्यांचे कौतुक करून प्रत्येक गीतानंतर टाळ्यांचा कडकडाट केला. तसेच भरगोस बक्षिसांचा वर्षाव केला. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन बहारदारपणे ज्ञानेश्वर कोटूळे व आभार प्रदेर्शन श्रीमती धन्वे मॅडम यांनी केले.

## गवळवाडी येथील २७ वा अखंड हरिनाम सप्ताह भक्तीभावाच्या वातावरणात संपन्न

बीड दि १५ (प्रतिनिधी)-गवळवाडी येथे आयोजित २७ व्या अखंड हरिनाम सप्ताहाची सांगता महंत शिवाजी महाराज यांच्या आदेशाने ह.भ.प. अक्षय महाराज तळेकर यांच्या भावपूर्ण व आध्यात्मिक कीर्तनाने उत्साहात व भक्तीमय वातावरणात झाली. या सप्ताहानिमित्त संघर्ष योद्धा मनोज दादा जरांगे पाटील यांनी सदिच्छा भेट देऊन भाविक भक्तांना शुभेच्छा दिल्या.

यावेळी महाराजांनी कीर्तनात ''श्रीकृष्णाचा काला'' हा अत्यंत सुंदर दृष्टांत सांगण्यात आला. वाळवंटात भटकणाऱ्या जीवाला जसे पाण्याचे महत्त्व कळते, तसेच संसाराच्या वाळवंटात भटकणाऱ्या मनुष्याला भगवंताच्या नामस्मरणाचे महत्त्व ओळखावे, हा या काल्याचा मुख्य संदेश



होता. या प्रसंगी संघर्ष योद्धा मनोज दादा जरांगे पाटील यांच्या समवेत गणेश बप्पा उगले, राष्ट्रवादीचे राजेंद्र मस्के, उद्योजक संजय बापू पवार, अँड संतोष भाऊ घोलप,सरपंच काशिनाथ अण्णा खांडे, माजी सैनिक शिंदे काका, मजूर फेडरेशन संचालक बद्रीनाथ जटाळ, युवा नेते रामा वायभट यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते. या सप्ताहासाठी शिवसेना उपजिल्हाप्रमुख गणेश बप्पा उगले यांनी या अखंड हरिनाम सप्ताहासाठी ११ हजार रुपयांची तर उद्योजक संजय बापू पवार यांनी ५० हजार रुपयाची तर राष्ट्रवादी काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष राजेंद्रजी मस्के यांनी ६० हजार रुपयाची देणगी जाहीर केली.या सप्ताहाच्या सुंदर आयोजन आणि नियोजनासाठी गवळवाडी गावचे उद्योजक व सरपंच गणेश बापू मस्के, उपसरपंच युवराज मस्के, सप्ताह समिती कमिटी मधील प्रमुख असलेले सर्वश्री अनुरथ भाऊ मस्के, सखाराम दादा मस्के, भागवतराव मस्के, गणेशराव मस्के, गोरखनाथ मस्के, भरत मस्के, हरिश्चंद्र नाना मस्के, उद्योजक विशाल बोबडे, विशाल गायकवाड, गोरखनाथ मस्के, निवृत्त फौजदार किसनजीला मस्के, पैलवान बंडूभाऊ मस्के, पैलवान अशोक दादा मस्के, भीमा मस्के, नवनाथ मस्के, दत्ता मस्के, इतर मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# गंभीर जखमी निराधाराचा उपचारापुर्वीच मृत्यु

जामखेड दि १५ (प्रतिनिधी)- शहरातील खर्डा चौकात जखमी अवस्थेत आढळलेल्या निराधार व्यक्तीस सामाजिक कार्यकर्ते संजय कोठारी यांनी दवाखान्यात दाखल केले. मात्र डॉक्टरांनी मयत घोषित केले.

शनिवार दि १४ रोजी सकाळी १० वाजल्यापासून शहरातील खर्डा चौकात एक निराधार व्यक्ती रस्त्याच्या मध्यभागी जखमी अवस्थेत पडली असल्याचे सामाजिक कार्यकर्ते संजय कोठारी यांना प्रवीण होळकर यांनी फोनवर कळवले. यावर कोठारी यांनी दीपक भोरे ,ऋषिकेश शेळके, सत्यम भापकर यांना सोबत घेवून घटनास्थळी धाव घेतली. यावेळी हा निराधार व्यक्ती गंभीर जखमी अवस्थेत होता. त्याचे पायावरून गाडी गेली असावी पाय मोडलेल्या अवस्थेत होता. अशा परिस्थितीत संजय कोठारी यांनी स्वतः आपल्या सहका-यांसमवेत त्यास रूग्णवाहिकेतून ग्रामीण रुग्णालयात दाखल केले .तेथे वैद्यकीय अधिकारी डॉ कुंडलिक अवसरे यांनी त्यास मृत घोषित केले.दरम्यान या निराधार व्यक्तीची ओळख पटली असून, अशोक दिगंबर जाधव वय ४६ , राहणार जामखेड असे त्याचे नाव असल्याची माहिती सामाजिक कार्यकर्ते संजय कोठारी यांनी दिली.यावेळी संजय कोठारी म्हणाले, शनिवारी बाजार दिवस असल्याने, खर्डा चौकात सकाळी दहा वाजलेपासून दुपारी एक वाजेपर्यंत कुणीही त्याच्याकडे लक्ष दिले नाही बरेच लोक आले गेले. मला फोन आल्यानंतर आपण ताबडतोब गेलो. परंतु सबंधीत निराधार व्यक्तीची परिस्थिती खूपच गंभीर असल्यामुळे त्यांना कुणीही हात लावण्यास तयार होत नव्हते. यावेळी पोलीस कॉन्स्टेबल नासिर खान आणि एक वाटसरू आणि माझे सहकारी ऋषिकेश शेळके ,दीपक भोरे आरोग्य मित्र सत्यम भापकर यांनी मदत केली.

## सरपंच पतीला सोशल मीडियावर शिवीगाळ प्रकरणी झाला ॲट्रॉसिटीचा गुन्हा दाखल

केज दि १५ (प्रतिनिधी) केज तालुक्यातील जीवाचीवाडी येथील अनुसूचित जातीच्या महिला सरपंच प्रेरणा काळे यांचे पती दीपक काळे यांना गावातीलच एकाने सोशल मीडियावर अश्लील आणि जाती वाचक शिवीगाळ केल्या प्रकरणी आरोपी विरुद्ध केज पोलिसात ॲट्रॉसिटीचा गुन्हा दाखल झाला असल्याची माहिती सूत्राकडून समजली

या बाबत सविस्तर माहिती अशी की, केज तालुक्यातील जिवाचीवाडी येथील अनुसूचित जातीच्या महिला सरपंच प्रेरणा काळे यांचे पती दीपक रामभाऊ काळे आणि बंडू नारायण चौरे हे दोघे वॉट्सअप च्या सन २०२२-२३ इलेक्शन टीम या नावाच्या वॉटसअप ग्रुपमध्ये सहभागी आहेत. या ग्रुपवर बंडू चौरे याने दीपक काळे यांना अनेकदा अश्लील भाषेत शिवीगाळ केली. त्याच बरोबर जातीवाचक शिवीगाळ करीत जीवे मारण्याची धमकी दिली. त्यामुळे बुधवार, दि. ११ फेब्रुवारी २०२६ रोजी रात्री दीपक काळे यांनी दिलेल्या फिर्यादी वरून बंडू चौरे याच्याविरुद्ध केज पोलीस ठाण्यात अनुसूचित जाती जमाती अत्याचार प्रतिबंधक कायद्यान्वये गुन्हा दाखल झाला आहे. प्रभारी सहाय्यक पोलीस अधीक्षक ऋषिकेश शिंदे हे पुढील तपास करीत असल्याचे सूत्रांनी सांगितले.

## भगवान विद्यालयातील दहावीच्या विद्यार्थ्यांचा शुभचिंतन सोहळा संपन्न

बीड दि १५ (प्रतिनिधी)- शहरातील भगवान विद्यालयामध्ये शालांत प्रमाणपत्र परीक्षा मार्च २०२६ ला बसलेल्या विद्यार्थ्यांना शुभचिंतन सोहळा उत्साहात संपन्न झाला. या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी संस्थेचे कार्यकारी अध्यक्ष गो.गो. मिसाळ सर होते तर. प्रमुख अतिथी व मार्गदर्शक म्हणून समुपदेशक डॉ. धनंजय गायकवाड पाटील सर लाभले होते.

संस्था अध्यक्ष झेड एन सानप सर, संस्था कोषाध्यक्षा डॉक्टर सौ वृषालीताई सानप मॅडम, ज्येष्ठ संचालक अण्णासाहेब जायभाये, संचालक सत्यसेन मिसाळ सर, माजी प्राचार्य परशुराम मराडे सर, रमेशराव सानप ग्रामपंचायत अधिकारी, गुरुकुल संचालक इंगळे सर व गिरे सर , शाळेचे मुख्याध्यापक आघाव सर, उपमख्याध्यापक गर्जे सर, पर्यवेक्षक ढोकर सर, श्रीमती गायकवाड मॅडम यांची विचार मंचावर प्रमुख उपस्थिती होती.प्रारंभी वै.ह.भ.प.भगवान बाबा यांच्या प्रतिमेचेपूजन, कै. गुरुवर्य भा.वा. सानप सरांच्या समाधीचे पूजन व कै.श्रीमती शोभाताई सानप यांचे समाधी पूजन मान्यवरांच्या शुभहस्ते करण्यात आले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक शाळेचे मुख्याध्यापक आघाव सरांनी केले. नितीन जाधव सर व डी.पी.डोळे सर यांचा सत्कार कार्यक्रमाचे अध्यक्ष व संस्थाअध्यक्ष या दोहोंच्या हस्ते करण्यात आला. दहावीच्या विद्यार्थ्यांनी दिलेली भेटवस्तू लोखंडी कपाट शाळेचे मुख्याध्यापक, उपमुख्याध्यापक व पर्यवेक्षक यांनी स्विकारली. साक्षी पिंगळे व चैतन्य कोकाटे या विद्यार्थ्यांनी मनोगतातून शालेय ऋण व्यक्त केले. सत्यसेन मिसाळ सर, डॉ. वृषालीताई, झेड एन सानप सर यांनी विद्यार्थ्यांना परीक्षेसाठी शुभेच्छा दिल्या. मराडे सरांनी परीक्षेसाठी विद्यार्थ्यांना शुभाशीर्वाद दिले. डॉ. धनंजय गायकवाड पाटील सर यांनीही विचार मांडले.अध्यक्षीय समारोप गो.गो.मिसाळ सरांनी केला. सूत्रसंचालन डी.पी.डोळे सर यांनी केले. तर उपस्थितांचे आभार उपमुख्याध्यापक गर्जे सर यांनी मानले.

# संपादकीय

## निष्कलंक चारित्र्याचे, अजातशत्रू व्यक्तिमत्व आर आर पाटील

राजकारणातील अजातशत्रू व्यक्तिमत्व अशी ओळख असलेले निष्कलंक चारित्र्याचे माजी उपमख्यमंत्री रावसाहेब राजाराम पाटील उर्फ आर आर पाटील यांचा आज स्मृतिदिन. आजच्याच दिवशी म्हणजे १६ फेब्रुवारी २०१५ रोजी आर आर पाटील यांचे अल्पशा आजाराने निधन झाले होते. आर आर पाटील यांच्या निधनाने संपूर्ण महाराष्ट्र हळहळला होता. आर आर पाटील म्हणजे राजकारणातील आम आदमी. शेतकरी असोत की सर्वसामान्य नागरिक, गरीब असोत की वंचित प्रत्येकाला आर आर पाटील आपले वाटत होते. राजकारणात उपमुख्यमंत्री पदासारख्या मोठ्या पदापर्यंत पोहचूनही कायम जमिनीवर राहून जनतेशी नाळ टिकवलेले आर आर पाटील सर्वसामान्यांचे नेते होते म्हणूनच त्यांना सर्वसामान्य नागरिक त्यांना प्रेमाने आबा म्हणत. १६ ऑगस्ट १९५७ रोजी सांगली जिल्ह्यातील तासगाव तालुक्यातील अंजनी गावात एका गरीब शेतकरी कुटुंबात आबांचा जन्म झाला. घरची परिस्थिती गरिबीची असल्याने आबांनी कमवा आणि शिका या योजनेतून शिक्षण घेतले. बी ए झाल्यानंतर त्यांनी एलएलएलबी चे ही शिक्षण घेतले. कॉलेज जीवनातच त्यांनी शेतकऱ्यांचे, सर्वसामान्य नागरिकांचे प्रश्न शासन दरबारी मांडायला सुरुवात केली. त्यांच्यातील नेतृत्व गुण वसंत दादा पाटलांनी हेरले आणि त्यांना राजकारणात आणले. कोणतीही राजकीय पार्शवभूमी नसताना समाजासाठी काहीतरी करण्याची जिद्द, मनाला भिडणारी भाषण शैली आणि स्वच्छ प्रतिमेच्या जोरावर त्यांनी अल्पावधीतच राजकारणात बस्तान बसवले. १९७९ साली पहिल्यांदा जिल्हा परिषद सदस्य म्हणून आबा निवडून आले. १९७९ ते १९९० असे एकवीस वर्ष आबा जिल्हा परिषद सदस्य होते. १९९० साली आबांनी पहिल्यांदा विधानसभेची निवडणूक लढवली आणि प्रचंड मतांनी जिंकली. त्यानंतर २०१४ पर्यंतच्या विधानसभेच्या सर्व निवडणुका आबांनी जिंकल्या. १९९५ साली आबा दुसऱ्यांदा आमदार झाल्यावर राज्यात युतीचे सरकार आले. विरोधी पक्षात असलेल्या आबांनी राजकीय आयुधांचा वापर करून अनेकदा सत्तधाऱ्यांना कोंडीत पकडले. विरोधी पक्षात असूनही आबांनी विधानसभा गाजवून सोडली. १९९९ साली राष्ट्रवादीची स्थापना झाल्यावर ते राष्ट्रवादीत आले. शरद पवार यांचे अत्यंत विश्वासू साथीदार अशी त्यांची ओळख बनली. त्यांनीही राष्ट्रवादी घराघरात पोहचवण्यासाठी जीवाचे रान केले. ते काही काळ राष्ट्रवादी काँग्रेसचे राज्याचे अध्यक्ष होते. राज्य मंत्रिमंडळात त्यांना अनेक महत्वाची पदे मिळाली. आर आर पाटील ग्रामविकास मंत्री असताना त्यांनी संत गाडगे बाबा ग्राम स्वच्छता अभियान यशस्वीपणे राबवून स्वतःची वेगळी ओळख निर्माण केली. पुढे राज्याचे गृहमंत्री आणि उपमुख्यमंत्री पदाची जबाबदारीही त्यांनी स्वीकारली. गृहमंत्री असताना त्यांनी राज्यातील डान्स बार बंद करण्याचा ऐतिहासिक निर्णय घेतला. डान्स बार बंद करण्याचा त्यांच्या निर्णयाला कडाडून विरोध झाला पण ते आपल्या निर्णयावर ठाम राहिले. गृहमंत्री असतानाच त्यांनी महात्मा गांधी तंटामुक्ती अभियान राबवले. गृहमंत्री असताना त्यांनी खाजगी सावकारी विरूध्दही दंड थोपटले होते तसेच त्यांनी गुटखा बंदी करण्याचा देखील निर्णय घेतला होता. त्यांच्या याच धडाकेबाज निर्णयांनी त्यांनी सर्वसामान्यांच्या मनात आदराचे स्थान निर्माण केले होते. गृहमंत्री, उपमुख्यमंत्री अशी मोठी पदे भूषवूनही आबांनी तळागळातील कार्यकर्त्यांशी असलेला संवाद तुटू दिला नाही. सत्ता येते आणि जाते जोडलेले माणसे टिकवली पाहिजेत हे आबांनी आपल्या कृतीतून दाखवून दिले. उच्च पदावर पोहचूनही आबांनी आपला साधेपणा कायम ठेवला. इतक्या मोठ्या पदावर असतानाही आबांनी आपल्या पाल्यांना महागड्या इंग्रजी शाळेत न घालता जिल्हा परिषदेच्या मराठी शाळेत घातले होते. आबांसारखे तळागळातून आलेले स्वच्छ चारित्र्याचे निष्कलंक, अजातशत्रू व्यक्तिमत्व राजकारणात विरळच. सध्याच्या गढूळ राजकीय वातावरणात तर आबांसारख्या निष्कलंक चारित्र्याच्या नेत्याची आवर्जून आठवून येते. राजकारणात त्यांनी जो आदर्श घालून दिला आहे त्याचे अनुकरण आजच्या राजकीय नेत्यांनी केले तरच राजकीय नेत्यांवरील जनतेचा उडालेला विश्वास पुन्हा प्राप्त होईल. आबांना स्मृतिदिनी विनम्र अभिवादन!

# पाटोद्यात शिवजयंती निमित्त अस्थिरोग व मनके विकार निदान व उपचार शिबिराचे आयोजन

## बहुसंख्य नागरिकांनी लाभ घ्यावा-डॉ.राजपुरे



पाटोदा दि १५ (प्रतिनिधी)-पाटोदा शहरात शिवजन्मोत्सव समिती आणि संचेती हॉस्पिटलच्या माध्यमातून बुधवार रोजी सकाळी ८ ते २ यावेळी मोफत अस्थिरोग व मणके विकार निदान व उपचार शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे.पाटोदा येथे आरोग्याचा जागर - करीत शिवजयंती साजरी होणार आहे. अस्थिरोगाने त्रस्त रुग्णांनी या मोफत शिबाराचा लाभ घ्यावा असे आव्हान पाटोदा तालुका डॉक्टर असोसिएशनचे अध्यक्ष व संचेती हॉस्पिटलचे पॅनल मेंबर डॉक्टर रवींद्र राजपुरे यांनी केला आहे. भारतातील नामांकित संचेती इन्स्टिटयूट फॉर ऑर्थोपेडिक्स अँड रिहाबिलीटेशन पुणे आणि शिवजन्मोत्सव समिती पाटोदा यांच्या वतीने २०२२ पासून शिवजन्मोत्सव समिती आणि संचेती हॉस्पिटल पुणे यांच्या वतीने शिबिर घेण्यात येत आहे.तसेच दरमहा पाटोदा येथील राजपुरे हॉस्पिटल मध्ये कॅम्प घेण्यात येतो यामध्ये अस्थिरोगाने पिडीत रुग्ण पाटोदा शहरातच संचेती हॉस्पिटलच्या तज्ञ डॉक्टरांच्या निगराणी खाली उपचार घेत असल्याने या कॅम्पला भरभरून प्रतिसाद मिळत संचेती हॉस्पिटलचे तज्ञ डॉक्टरांनी ५००० रुग्णांना अद्यापपर्यंत उपचार केले आहे. यंदाच्या शिवजयंती निमित्त हे तज्ञ डॉक्टर रुग्णांना मोफत सेवा देणारा असून यामध्ये प्रामुख्याने सांधेदुखी, संधीवात, सांधेप्रत्यारोपण, कंबर दुखणे, हाता-पायांना मुंग्या येणे, फ्रोजन शोल्डर, मणक्यांचे जुने आजार, डायबेटिक न्यूरोपॅथी, सायटिका पेन, टेनिस एल्बो मेंदूचे आजार, हिप व नील रिप्लेसमेंट नंतरचे उपचार करण्यात येणार आहे. तरी या शिबिराचे सर्व पाटोदा व परिसरातील नागरिकांनी लाभ घ्यावा असे आवाहन डॉ.रविंद्र राजपुरे यांनी केले असुन गरजु लोकांनी लवकरात लवकर राजपुरे हास्पिटल बार्शी रोड नगरपंचायत समोर येथे नोंदणी करावी असे आवाहनही शिवजन्मोत्सव समितीच्या वतीने करण्यात आले आहे.

# रक्तदान करून शिवजयंती साजरी करण्याचे आवाहन

किल्ले धारूर दि १५ (प्रतिनिधी)- धारूर येथे दरवर्षीप्रमाणे याही वर्षी सकल मराठा समाजाच्या वतीने छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त विविध सामाजिक उपक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.
दि. १९ फेब्रुवारी (गुरुवार) रोजी शिवजयंतीनिमित्त पुढीलप्रमाणे कार्यक्रम आयोजित करण्यात आले आहेत.
छत्रपती शिवाजी महाराज व्यापारी संकुलन येथे सकाळी ९.३० वाजता महाराजांच्या मूर्तीचा दूध राज्याभिषेक होणार असून, त्यानंतर सकाळी १० वाजता रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. रक्तदानानंतर सहभागी रक्तदात्यांसाठी अल्पोपहाराची व्यवस्थाही करण्यात आली आहे.रक्तदान हे श्रेष्ठ दान असून, त्यामुळे अनेक गरजू रुग्णांचे प्राण वाचू शकतात. त्यामुळे शिवजयंतीचे औचित्य साधून अधिकाधिक शिवप्रेमींनी या रक्तदान शिबिरात सहभाग नोंदवून सामाजिक बांधिलकी जपावी, असे आवाहन सकल मराठा समाजाच्या वतीने करण्यात आले आहे.शिवजयंती हा केवळ उत्सव न राहता समाजोपयोगी कार्यातून साजरा व्हावा, या उद्देशाने हा उपक्रम राबविण्यात येत असून नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असेही आयोजकांकडून कळविण्यात आले आहे.

# पाटोद्याच्या सुरळीत पाणी पुरवठ्यासाठी नगरसेवक सय्यद आबुशेठ कार्यरत



पाटोदा दि.१५(प्रतिनिधी)- पाटोदा शहरातील वाढत्या पाणीटंचाईमुळे नागरिक हैराण झाले असताना पाण्याचा प्रश्न अधिकच गंभीर बनला आहे. या पार्श्वभूमीवर नगरसेवक सय्यद आबुशेठ यांनी हा गंभीर बनलेला पाणी प्रश्न सोडवण्यासाठी रात्रंदिवस मेहनत घेत आहे येथे .शहरातील विविध भागांमध्ये होत असलेली नळ गळती व तुटलेल्या पाईपलाईन मुळे पाणीपुरवठा होत नसल्याच्या तक्रारी वाढत होत्या. परिस्थितीचे गांभीर्य ओळखून नगरसेवक सय्यद आबुशेठ यांनी संबंधित अधिकाऱ्यांना व नगरपंचायत च्या काही कर्मचाऱ्यांना सोबत घेत स्वतः कामाच्या ठिकाणी उपस्थित राहून दुरुस्तीवर लक्ष केंद्रीत केले. केवळ पाहणी न करता प्रत्यक्ष कामात सहभाग घेत त्यांनी कर्मचाऱ्यांचा उत्साहही वाढवला.सध्या दुरुस्तीची कामे युद्धपातळीवर सुरू असून आवश्यक यंत्रसामग्री व साहित्य तत्काळ उपलब्ध करून देण्यात आले आहे. येत्या काही दिवसांत संपूर्ण शहराचा पाणीपुरवठा पूर्ववत आणि सुरळीत करण्यात येणार असून नागरिकांना दिलासा मिळणार आहे, असा ठाम विश्वास नगरसेवक सय्यद आबुशेठ यांनी व्यक्त केला.दरम्यान, पाणी समस्येवर कायमस्वरूपी तोडगा काढण्यासाठी आमदार सुरेश आण्णा धस यांच्या मार्गदर्शनाखाली विशेष आराखडा तयार करण्यात येणार असून भविष्यात अशी परिस्थिती निर्माण होऊ नये यासाठी ठोस उपाययोजना राबवण्यात येतील, असेही त्यांनी वार्ताहरांशी बोलताना स्पष्ट केली

# महाशिवरात्रीनिमित्त धुनकवाड येथे शिवपुराण कथेची भक्तिमय सांगता

किल्ले धारूर दि १५ (प्रतिनिधी)-धारूर तालुक्यातील धुनकवाड येथील ग्रामदैवत धुनकेश्वर मंदिरात महाशिवरात्री निमित्त माजी उपसरपंच बाबुराव भोसले यांच्या वतीने गेल्या सात दिवसांपासून सुरू असलेल्या शिवपुराण कथेची सांगता महाशिवरात्रीच्या पवित्र दिवशी मोठ्या भक्तिभावाने करण्यात आली. या प्रसंगी श्री.दत्त संस्थान प. दहिफळ/प.पारगाव येथील ह.भ.प.अरविंद बाबा गिरी महाराज यांनी आपल्या प्रभावी वाणीने उपस्थित भाविकांना मार्गदर्शन केले.उपदेश करताना त्यांनी सांगितले की, पुराणांची वाणी ही दुरितांचे तिमीर नाहीसे करणारी तेजस्विनी आहे. मानवाच्या अंतःकरणात शुद्ध श्रद्धा असेल तरच जीवनाचे रहस्य उमगते. विकल्पाच्या डोळ्यांनी नव्हे तर श्रद्धेच्या स्वयंप्रकाश दीपाने जीवन उजळते. पुराणांचे चिंतन करून त्यानुसार आचरण केल्यास मनुष्याची वृत्ती सात्विक, स्वभाव सोज्वळ आणि वर्तन प्रामाणिक होते. मन स्फटिकासारखे स्वच्छ व गंगेप्रमाणे



निर्मळ बनते.आजच्या गतीमान युगात वेदशास्त्रांचा अभ्यास सर्वांना शक्य नसला तरी पुराणांमधील कथा सहज समजण्यासारख्या आहेत. त्या कथांमधून जीवनातील व्यथा सहन करण्याचे सामर्थ्य प्राप्त होते. शिवमहापुराणाच्या माध्यमातून जीवनाला योग्य दिशा मिळू शकते व दुःखदायक जीवन सुखमय होऊ शकते. सुख हे बाह्य वस्तूंवर अवलंबून नसून अंतर्मनातील ज्ञानावर अवलंबून असते. ज्ञानामुळे कर्तृत्वाचा अहंकार नाहीसा होतो. कर्तृत्वाचा अहंकार आणि फलाशा सोडून भक्तीमार्गावर चालल्यास हृदयातून निस्वार्थ भक्ती प्रकट होते. हे निस्वार्थ प्रेम हीच मानवी जीवनातील सर्वात मोठी दैवी देणगी असल्याचे त्यांनी नमूद केले. जो अनन्यभावाने भगवान शिव धुनकेश्वरांच्या चरणी शरण येतो, त्याचे दुःख-दरिद्र्य धुनकेश्वर दूर करतात. शरणागत भक्तांचे पाप-ताप नष्ट करणारे दैवत म्हणजे धुनकेश्वर असल्याचेही त्यांनी सांगितले.कथेच्या माध्यमातून विविध दृष्टांत देत सामाजिक प्रबोधन करताना अरविंद बाबा गिरी महाराजांनी विनोदी शैलीत जीवनातील अनेक रहस्ये उलगडून सांगितली. कार्यक्रमास ग्रामस्थ व भाविकांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

# कु.वैदेही नेमटचा उपजिल्हाधिकाऱ्यांच्या हस्ते सत्कार



माजलगाव दि १५(प्रतिनिधी) -तालुक्यातील शिंपे टाकळी येथील आदर्श शिक्षक किरण नेमट यांची कन्या कु. वैदेही नेमट हिने लातूर जिल्हा थलेटिक्स असोसिएशन तर्फे घेण्यात आलेल्या अंडर -१४ - ३०० मिटर रनिंग स्पर्धेत जिल्हास्तरावर प्रथम येऊन कोपरगाव ( शिर्डी ) येथील राज्यस्तरीय स्पर्धेत सहभाग नोंदवल्याबद्दल कु. वैदेही किरण नेमट हिचा पोस्ते पोतदार शाळेत उदगीरचे उपजिल्हाधिकारी सुशांत शिंदे, शाळेचे अध्यक्ष प्राचार्य , उपप्राचार्य मार्गदर्शक आडे सर यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला .



माजलगाव -शहरातील श्री मंगलनाथ येथे महाशिवरात्रीनिमित्त माजलगावचे तहसीलदार संतोष रुईकर सपत्नीक महापूजा करताना.

# स्वारातीम विद्यापीठात संत सेवालाल महाराज जयंती साजरी

नांदेड दि.१५ (प्रतिनिधी)- स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाच्या प्रशासकीय इमारतीतील स्वागत कक्षामध्ये आज रविवार, दि.१५ फेब्रुवारी, २०२६ रोजी संत सेवालाल महाराज यांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. या प्रसंगी विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. मनोहर चासकर यांच्या हस्ते संत सेवालाल महाराज यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.यावेळी प्र-कुलगरू डॉ. अशोक महाजन, नवोपक्रम, नवसंशोधन व साहचर्य मंडळाचे संचालक डॉ.शैलेश वाढेर, जनसंपर्क अधिकारी डॉ. अशोक कदम, गोविंद हंबर्डे, शिवाजी हुंडे, शैलेश कांबळे व बबन हिंगे यांची प्रमुख उपस्थिती होती.याप्रसंगी विद्यापीठातील प्राध्यापक, अधिकारी, कर्मचारी व विद्यार्थ्यांनी संत सेवालाल महाराज यांच्या प्रतिमेस पुष्प अर्पण करून अभिवादन केले.

# व्यसन करू नका, नितीनेच कमवा; मनोज दादा जरांगे पाटील यांचे आवाहन



कुर्ला दि १५(प्रतिनिधी) - महाशिवरात्रीनिमित्त श्री क्षेत्र संगमेश्वर संस्थान कुर्ला येथे संघर्ष योद्धा मनोज दादा जरांगे पाटील यांनी भेट देत समाजाला सकारात्मक आणि प्रबोधनपर संदेश दिला.आपल्या भाषणात त्यांनी सामाजिक सलोखा जपण्याचे आवाहन करत धार्मिक कार्यक्रमांमध्ये जाती-पातीवर कोणीही बोलू नये, अशी ठाम भूमिका मांडली. जरांगे पाटील यांनी युवकांना व सर्व समाजबांधवांना व्यसनापासून दूर राहण्याचे आवाहन केले. दारू व इतर व्यसनांनी कुटुंब आणि समाज दोन्ही उद्ध्वस्त होतात. व्यसन करू नका, असा ठाम संदेश त्यांनी दिला.तसेच संत तुकाराम महाराजांच्या अभंगातील जोडोनिया धन उत्तम व्यवहारे या ओळीचा संदर्भ देत त्यांनी सांगितले की, प्रत्येकाने प्रामाणिक मार्गाने आणि नीतीने धन कमवावे; चुकीच्या मार्गाने कमावलेले धन कधीही सुख देत नाही.तरुणांनी आपल्या घरच्या कामात मदत करावी तसेच शेतीसह कोणतेही प्रामाणिक काम करताना लाज बाळगू नये, असेही त्यांनी सांगितले. कष्टाला कधीही कमीपणा समजू नका; परिश्रम हीच खरी ताकद आहे, असे आवाहन त्यांनी केले.याप्रसंगी संस्थानचे मठाधिपती पुरुषोत्तम महाराज मस्के, दत्ता महाराज बडगे तसेच कुर्ला गाव व पंचक्रोशीतील हजारो नागरिक उपस्थित होते. महाशिवरात्रीच्या पवित्र पर्वावरून समाजामध्ये व्यसनमुक्ती, प्रामाणिकपणा व सामाजिक एकतेचा संदेश देणारा हा कार्यक्रम ठरला.

# ई शिवाई बस सवलतीस दिव्यांगाना नकार; प्रहार जनशक्ती पक्ष आंदोलन करणार

माजलगाव दि १५ (प्रतिनिधी)- राज्य परिवहन महामंडळाच्या सर्व प्रकारच्या बसेस मध्ये दिव्यांगाना सवलत व आरक्षण असताना ई-शिवाई बस व स्लीपर कोच , शिवनेरी या बसमध्ये मात्र दिव्यांगाना सवलत देण्यास टाळाटाळ होत आहे, या बस मध्ये सर्वसामान्य प्रवाशांना जेष्ठ नागरिक सवलत,महिलांना ५० टक्के सूट,७५ वर्षांवरील नागरिकांना मोफत प्रवास अशा विविध प्रकारच्या सवलती दिल्या जात असताना दिव्यांगाना मात्र या सवलतींपासून वंचित ठेवण्यात आले आहे. दिव्यांगाना ही सवलत तात्काळ लागू करावी अन्यथा बच्चू कडु यांच्या मार्गदर्शनाखाली राज्यभर प्रहार जनशक्ती पक्षाचे वतीने आंदोलन करण्यात येईल अशी मागणी या संघटनेचे अध्यक्ष गोपाल पैंजणे यांनी परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांच्याकडे केली आहे. केंद्र शासन व राज्य शासनाकडून दिव्यांग बांधवांना जास्तीत जास्त शासकीय सुविधा देण्याचा प्रयत्न आहे. त्यामुळे देशात व राज्यात खास करून दिव्यांग खाते निर्माण करण्यात आलेले आहे. या माध्यमातून दिव्यांगांना शासनाच्या सोयी, सवलती, मानधन देण्यात येते. राज्य शासनाच्या परिवहन महामंडळाच्या सर्व बसेस मध्ये दिव्यांग बांधवांना सवलत देण्याचा शासनाचा अधिनियम आहे. त्याप्रमाणे परिवहन महामंडळाच्या लालपरी, एशियाड, आराम,निमआराम,शिवशाही आदि बसेस मध्ये ७५ % सवलत आहे. त्याचप्रमाणे मागील एक- दीड वर्षांपूर्वी सुरू झालेल्या इलेक्ट्रिक बस मध्ये सुद्धा दिव्यांगांना सवलत आहे. मात्र स्लीपर कोच व मागील काही महिन्यापूर्वी सुरू झालेल्या ई शिवाई बसेस मध्ये महामंडळाने दिलेल्या सवलती नुसार महिला, वयोवृद्ध या सह अन्य नागरिकांना सवलत देण्यात येते मात्र मुद्दामहून दिव्यांगाना या बसेस मध्ये सवलत दिली गेलेली नाही.महामंडळात बसलेल्या वरिष्ठ पदावरील अधिकाऱ्यांकडून जाणीवपूर्वक दिव्यांगांवर अन्याय करण्याचा प्रकार घडवून आणलेला आहे, ही गंभीर बाब



असून याची परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी तातडीने दखल घेऊन संबंधित खो घालणाऱ्या अधिकाऱ्यांवर कारवाई करून स्लीपर कोच व ई-शिवाई, शिवनेरी व इतर सर्व बससेवेत तात्काळ सवलत लागू करण्याचे आदेश द्यावेत, दिव्यांगावरील हा अन्याय दूर न झाल्यास प्रहार जनशक्ती पक्ष राज्यात तीव्र आंदोलन करेल असा इशाराही या निवेदनात देण्यात आला आहे.या निवेदनावर पक्षाचे तालुकाध्यक्ष गोपाळ पैजने, भारत डोंगरे, विजय जोगडे ,नितीन कांबळे, अशोक अर्जुन ,लक्ष्मण गरड यांच्या सह्या आहेत.

# प्रा.टी.पी.मुंडे यांच्या हस्ते सोमेश्वर महाराजांच्या पालखीस फराळ वाटप

परळी दि.१५(प्रतिनिधी):- महाशिवरात्रीच्या पावन पर्वा निमित्त व भक्तिमय वातावरणात सोमेश्वर महाराजांच्या पालखी सोहळ्यात भाविकांसाठी फराळ वाटप कार्यक्रमाचे दरवर्षी प्रमाणे याही वर्षी आयोजन करण्यात आले होते. या पवित्र प्रसंगी शिवसेनेचे बीड जिल्हा संपर्कप्रमुख प्रा.टी.पी.मुंडे सर यांच्या हस्ते फराळ वाटप करण्यात आले. सोनाई अँग्रो फूड प्रॉडक्टस प्रा.लि. व सोनाई कन्स्ट्रक्शन कं.लि. याच्या सौजन्याने कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी त्यांनी सोमेश्वर महाराजांच्या पालखीचे सारथ्य केले. सोमेश्वर महाराजांची पालखी प्रभुवैद्यनाथाच्या दर्शनासाठी जिरेवाडी येथून दरवर्षी प्रस्थान करते.पालखी सोहळ्यात मोठ्या संख्येने भाविकांनी सहभाग घेतला होता. हर हर महादेव च्या जयघोषात आणि भक्तीमय वातावरणात हा सोहळा संपन्न झाला. प्रा. मुंडे यांनी उपस्थित भाविकांना महाशिवरात्रीच्या शुभेच्छा देत समाजात एकात्मता, सद्भावना आणि श्रद्धा जोपासण्याचे आवाहन केले. पालखी सोहळ्यात टाळ वाजवत आणि अभंग म्हणत त्यांनी वारकऱ्यांसोबत आनंद लुटला. त्यांच्या सर्व कुटुंबीयांनी सोमेश्वर महाराजांच्या पालखीचे दर्शन घेतले. फराळ वाटपाचा माध्यमातून भक्तांची सेवा करण्याचा आनंद उपस्थितांना लाभला. यावेळी शेतकरी सेनेचे उपाध्यक्ष नाथराव कराड, आत्माराम कराड,भीमराव मुंडे, सूर्यकांत मुंडे, परळी नगरपालिकेच्या पाणीपुरवठा सभापती श्रीमती जयश्री ताई रवींद्र पापा गीते मुंडे,रवींद्र पापा गीते,शफीभाई,गंगाधर आप्पा रोडे, संतराम गडदे, दत्तात्रय ढवळे, पंडित झिंजुर्डे,प्रा. विजय मुंडे, माजी जि.प. सदस्य प्रदीप भैय्या (बबलू शेठ) मुंडे, मधुकर मुंडे, ताराचंद फड, प्रभाकर गवळी, माणिकराव सलगर, बाळासाहेब लोंढे, माधव ताटे, श्याम गडेकर, नूरबालो खाला,दौलत ढाकणे,श्रीनिवास कुलकर्णी, धनंजय कावळे, मधुकर ढाकणे, विनायक नागरगोजे, वाल्मीक नागरगोजे, कारभारी फड,गंगाधर नागरगोजे, गोपाळ नागरगोजे, राजाभाऊ तांबडे, शिवा चिखले, सोमनाथ आघाव,रोहन आघाव ,गोविंद आघाव, प्रवीण घाडगे आदीसह कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# महाशिवरात्री निमित्त श्रीक्षेत्र बेलेश्वर संस्थान येथे दर्शनासाठी भाविकांची गर्दी



लिंबागणेश दि १५ (प्रतिनिधी) : बीड तालुक्यातील बालाघाटावरील लिंबागणेश पंचक्रोशीतील बेलगाव येथील श्रीक्षेत्र बेलेश्वर मंदिर येथे आज महाशिवरात्री निमित्त भाविकांची मोठी गर्दी झाली होती. मंदिराच्या गाभाऱ्यात तसेच दर्शन मंडप आणि परिसरात फुलांच्या माळांनी आकर्षक सजावट व विद्युत रोषणाई करण्यात आली होती.

यावेळी संस्थानचे मठाधिपती महंत महादेव भारती महाराज तसेच शांतीब्रम्ह तुकाराम भारती महाराज यांचे दर्शन घेऊन आशीर्वाद घेतले.मंदिर रोडवर विविध व्यावसायिकांनी दुकाने थाटली असून भाविकांसाठी साबुदाणा खिचडी व केळीचे वाटप करण्यात आले. यात्रेनिमित्त पोलिस बंदोबस्त वाढविण्यात आला असून लिंबागणेश पोलिस चौकीचे सहाय्यक फौजदार विठ्ठल राठोड, गणेश परझने तसेच होमगार्ड तैनात करण्यात आले आहेत.महाशिवरात्री निमित्त मंदिरात अखंड हरिनाम सप्ताहाचे आयोजन करण्यात आले आहे. उद्या दि.१६ सोमवार रोजी शांतीब्रम्ह तुकाराम भारती महाराज यांच्या सुश्राव्य कीर्तनाने सप्ताहाची सांगता होणार असून त्यानंतर महाप्रसादाचे वाटप करण्यात येणार आहे. भाविकांनी याचा लाभ घ्यावा, असे आवाहन बेलेश्वर संस्थानच्या वतीने करण्यात आले आहे.

## श्री क्षेत्र अश्वत्थलिंग दर्शनाला भाविक-भक्तांची गर्दी दाटली



पिंपळवंडी दि.१५(प्रतिनिधी) : पंचक्रोशीतील भाविक-भक्तांचे श्रद्धास्थान असलेल्या पाटोदा तालुक्यातील पिंपळवंडी येथील श्री.क्षेत्र अश्वत्थलिंग शिवपार्वती देवालयात प्रतिवर्षाप्रमाणे याही वर्षी महाशिवरात्रीनिमित्त (रविवारी) दर्शनासाठी भाविक-भक्तांनी मोठ्या संख्येने येऊन दर्शनाचा लाभ घेतला.पहाटेपासून रात्री उशिरापर्यंत पंचक्रोशीतील व दूरदूरवरून भाविक-भक्त विविध वाहनातून,काही पायी वारी करीत दर्शन घेताना चित्र पाहावयास मिळाले.या ठिकाणी मंदिरात अभिषेक, महापूजा विधीसह महिला-पुरुष भाविक- भक्तांनी शिवलिंग पिंडीस बेलपत्र वाहून मनोभावे दर्शन घेतले.भाविक-भक्त रांगेत दर्शन घेऊन नियमाचे पालन करताना दिसत होते. आज सोमवार दि.१६ फेब्रुवारी २०२६ रोजी महाशिवरात्री महोत्सवाची मठाधिपती महंत गुरुवर्य ह.भ.प.महादेवानंद भारती महाराज यांच्या काल्याच्या किर्तनाने महाप्रसादाने सांगता होत आहे.

## देश सेवा करून आलेले जवान पांडुरंग परजणे यांचा खालापूरी ग्रामस्थांनी केला जंगी सत्कार



खालापूरी (प्रतिनिधी) : शिरूर कासार तालुक्यातील खालापुरी येथील जवान पांडुरंग सुभाष राव परजणे यांनी २४ वर्ष भारतीय सैन्य दलात देशातील विविध भागात यशस्वी सेवा केली काल १४ फेब्रुवारी २०२६ रोजी ते सेवानिवृत्त झाले सेवानिवृत्तीनंतर त्यांचा सपत्नीक रक्षक ग्रुप व खालापुरी ग्रामस्थांनी काल शनिवारी सकाळी साडेदहाच्या सुमारास गावातून मिरवणूक काढून जंगी स्वागत केले .

पांडुरंग मंदाबाई सुभाषराव परजणे हे २००२ मध्ये भारतीय सैन्य दलात दाखल झाले होते उत्तर प्रदेशातील लखनऊ या ठिकाणी यांची ट्रेनिंग पार पडली त्यानंतर त्यांनी हरिद्वार, लेह, लदाख ,राजस्थान, पश्चिम बंगाल ,पंजाब, चंदिगड ,आणि पुणे या ठिकाणी कमांड हॉस्पिटलमध्ये चांगल्या प्रकारे सेवा केली काल १४ फेब्रुवारी रोजी ते सेवानिवृत्त झाले रक्षक ग्रुप व ग्रामस्थांनी ते गावाकडे येणार असल्याची माहिती मिळतात त्यांचा गावातून वाजत गाजत जंगी सपत्नीक सत्कार केला याप्रसंगी परिसरातील अनेक जवान व ग्रामस्थांनी त्यांच्याविषयी असलेले अनुभव व आतापर्यंत केलेले कार्य सांगितले यावेळी सत्काराला उत्तर देताना पांडुरंग परजणे म्हणाले की मला इतर सत्कारापेक्षा मायभूमीने केलेला सत्कार महत्त्वाचा असून तो मी कदापि विसरणार नसुन यापुढे युवकांना देश सेवा करण्यासाठी मार्गदर्शन करणार आहे देशसेवा हि ईश्वर सेवा असल्याचे सांगत प्रत्येकाने घरातून एक फौजी देश सेवेसाठी समर्पित करावा आवाहन करून माझ्यावरील असलेले प्रेम असेच कायम ठेवा असेही त्यांनी

बोलताना सांगितले. यावेळी जि .प शाळा व आदर्श विद्यालयातील सर्व विद्यार्थी तसेच गावातील व परिसरातील ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## महाशिवरात्री धाकटी पंढरीत श्री क्षेत्र नारायण गडावर भाविकांची मांदियाळी



कोळगांव, दि.१५ (प्रतिनिधी) : धाकटी पंढरी म्हणून ओळखल्या जाणाऱ्या नारायण गडावर दि.१५ फेब्रुवारी रोजी महाशिवरात्रीच्या निमित्ताने भाविकभक्तांनी पहाटे पासून दर्शनासाठी गर्दी केल्याने संपुर्ण परिसरात भक्तिमय वातावरण निर्माण झाले होते. यावेळी मठाधिपती महंत हभप शिवाजी महाराज यांच्या हस्ते महापुजा करण्यात आली.

बीड जिल्ह्यातील तिर्थक्षेत्र नारायण गडावर विठ्ठल रुक्मिणी मंदिराबरोबर महादेवाची स्वयंभु शिवलिंग आहे. दर महिन्याच्या एकादशीच्या आणि महाशिवरात्री निमित्ताने गर्दी होते. दरम्यान दि.१५ फेब्रुवारी २०२६ रोजीच्या महाशिवरात्री निमित्ताने गावगावातील महादेवाची शिवालय गजबजून गेली होती. श्री क्षेत्र नारायण गडाच्या पंचक्रोशीतील सर्व भाविकांनी अगदी सकाळपासुनच गडाच्या दिशेने वाटचाल करण्यास सुरुवात केली होती. यावेळी मठाधिपती महंत हभप शिवाजी महाराज यांच्या हस्ते महापुजा करण्यात आली. याचबरोबर पंचक्रोशीतील जवळच्या गावातील नागरिक, महिला, मुली व भाविकांनी चालत जाऊन दर्शन घेणे पसंत केले. यावेळी येणाऱ्या भाविकभक्तांसाठी मठाधिपती हभप शिवाजी महाराज यांच्या मार्गदर्शनाखाली संस्थानच्या वतीने पाणी, फराळाची व्यवस्था करण्यात आली होती. यावेळी गडावर भव्य वारीचे स्वरूप दिसून आले. नगद नारायण महाराज की जय, हर-हर महादेवाच्या नाम घोषाने मंदिर परिसर दणाणले होते.

# धाकट्या अलंकापुरीत ४८ वा महाशिरात्र सोहळा

### ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण व गाथाभजनाचा समारोप

### दुपारी भव्या ग्रंथ दिंडी नगरप्रदक्षणा शोभा यात्रा

### पहाटपासुन दर्शन व दिवसभर फराळ प्रसाद वाटप



प्रतीक भांडेकर

शिरूर कासार : सर्वदूर प्रसिध्दिस आलेल्या धाकटी अलंकापुरी सिध्देश्वर संस्थानवर रविवारी महाशिवरात्र सोहळ्याची महत्वपुर्ण पर्वणीवर पहाटपासुन दर्शन बारी सुरू होऊन दिवसभर येणा-या शिवभक्तांना फराळ वाटप सुरू राहणार आहे .सकाळी ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण व संत तुकाराम गाथा भजनाचा समारोप होणार असुन दुपारी चार वाजता परंपरेप्रमाणे दिंडी नगरप्रदक्षणा भव्य स्वरूपात होणार आहे .

गेली ४८ वर्षापुर्वी वै.आबादेव महाराज यांनी सुरू केलेला हा सोहळा महंत स्वामी विवेकानंद शास्त्री यांचे अध्यक्षतेखाली व घोषीत उत्तराधिकारी विवेक महाराज शास्त्री यांचे उपस्थितीत सुरू आहे .पौराणीक हेमाडपंथी शिवालय सिंदफना नदिकाठी असुन या संस्थानला सुमारे पंचवीस गाव जोडली गेलेली आहेत .सात दिवस ज्ञानदान आणि अन्नदान हा उपक्रम सुरू असतो .४८ वर्षापासुन अखंड अन्नदान परंपरा सात दिवस दुपारी आणि संध्याकाळी अन्नदान करणारे आजही त्यांची परंपरा साभाळून आहेत ,त्यात महाशिवरात्र दिवसभराचा फराळ हा डुंगरवाल परिवार देत आहे .महाशिवरात्रीची महापंगत ही नारळ पध्दतीने दिली जाते ,किमान दहाबारा वर्ष नंबर येण्याची प्रतीक्षा करावी लागते यावर्षी सोमवारी काल्याचे कीर्तन झालेनंतर ही महापंगत होणार असुन बारा वर्षापुर्वी राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष महेबुब शेख यांनी नारळ स्वरूपात स्विकारली होती त्यांची यावर्षी महापंगत होणार आहे. संस्थानवर दर्शन बारी ,फराळ ,प्रवचन, कीर्तन ,जागर असे कार्यक्रम होणार असुन हा उत्सव शांततेत व भक्ति पुर्ण वातावरणा साजरा होणार आहे .

## संत श्रीसेवालाल महाराजांची जयंती बदामराव पंडितांच्या उपस्थितीत साजरी

गेवराई दि १५(प्रतिनिधी) -संत श्री सेवालाल महाराज यांची जयंती रविवार दिनांक १५ फेब्रुवारी रोजी भाजपा नेते माजी राज्यमंत्री बदामराव पंडित यांच्या उपस्थितीमध्ये त्यांच्या संपर्क कार्यालयात उत्साहात साजरी करण्यात आली.

यावेळी संत सेवालाल महाराज यांच्या प्रतिमेला माजी राज्यमंत्री बदामराव पंडित यांच्यासह युवा नेते रोहित पंडित, माजी जि प सदस्य शामराव राठोड, नगरपरिषद सभापती शेख शेहदाद, कैलास राठोड, संतराम महाराज, विनायक चव्हाण, शेख सुलेमान, राजू टकले, सुरज भुतडा, विकास राठोड, दत्ता राठोड, ज्ञानेश्वर राठोड, विजय राठोड, राजू जाधव, बजरंग सानप, पंडित पवार, अमोल सुतार, जगन्नाथ गीते, शेख नविद, शिवाजीराव चव्हाण, रामदास मस्के, आप्पासाहेब शिंदे, जगन्नाथ जाधव, काशिनाथ बनसोडे आदींसह पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी पुष्पहार व पुष्प अर्पण करून अभिवादन केले. यावेळी बोलताना बदामराव पंडित म्हणाले की, संत श्री सेवालाल महाराज यांनी सामाजिक ऐक्य आणि एकमेकांना मदत करण्याची दिलेली शिकवण ही केवळ बंजारा समाज नाही तर इतर समाजाने सुद्धा आत्मसात करावी.

# नाळवंडीत शंकर पार्वती मूर्तीची स्थापना व महाशिवरात्री उत्साहात संपन्न

### रामेश्वर वाघमारे यांच्याकडून महाफराळाचे आयोजन ; श्री साई कथा संपन्न



नाळवंडी (प्रतिनिधी) : काल पूर्ण भारतभर महाशिवरात्री मोठ्या उत्साहामध्ये संपन्न झाली याच महाशिवरात्रीच्या निमित्ताने अनेक भाविक भक्तांनी आपली नवस्फूर्ती पूर्ण केली तर अनेकांनी भाविक भक्तांसाठी महाप्रसादाचे आयोजन केलेले पहावयास मिळाले होते तर अनेक ठिकाणी महादेव पार्वती मूर्तीची प्राणप्रतिष्ठा केल्यानंतर ह.भ.प अशोक महाराज शास्त्री यांच्या किर्तन सेवेने करत महाशिवरात्री संपन्न झाली.

याच महाशिवरात्रीच्या पार्श्वभूमीवर काल बीड तालुक्यातील नाळवंडी या ठिकाणी महाशिवरात्रीच्या महाशिव मुहूर्तावर प्रथम गावामध्ये महादेव पार्वती नूतन मूर्तीची मिरवणूक काढण्यात आली त्यानंतर या मूर्तीची प्राणप्रतिष्ठा मंदिराच्या परिसरामध्ये करण्यात आली यावेळी या प्राणप्रतिष्ठेला नाळवंडी गावासह पंचक्रोशीतील भावी भक्तांची मोठी हजेरी पाहायला मिळाली होती. याच मूर्ती प्राणप्रतिष्ठेच्या नंतर आजच्या महाशिवरात्रीचे अन्नदाते रामेश्वर वाघमारे सपत्नीक हस्ते संगमेश्वर देवस्थान या ठिकाणी महाआरती झाली व याच कार्यक्रमाला उपस्थित भक्तांसाठी फराळाच्या महाप्रसादाचे आयोजन आरती कर्ते रामेश्वर हरिश्चंद्र वाघमारे या भावी भक्ताने आयोजिले होते तर रात्री महाशिवरात्रीचे अवचित्य साधून श्री साई सेवा परिवार नाळवंडीच्या वतीने संगमेश्वर देवस्थान नाळवंडी या ठिकाणी साई कथेचे देखील आयोजन करण्यात आले होते यावेळी या साई कथेला महिला मंडळींची मोठी उपस्थिती पहायला मिळाली होती तर अतुल काका थेटे यांनी साई कथा सांगताना सर्व श्रोते मंत्रमुग्ध झालेले पहावयास मिळाले होते.

## सनातन संस्थेच्या वतीने महाशिवरात्री निमित्त विविध ठिकाणी ग्रंथ प्रदर्शन

बीड : महाशिवरात्रीनिमित्त सनातन संस्थेच्या वतीने बीड शहरात विविध ठिकाणी सात्विक उत्पादने व ग्रंथ प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले. बीड शहरात श्रीनिळकंठेश्वर महादेव मंदिर आणि परळी वैजनाथ येथे हे प्रदर्शन लावण्यात आले होते. महाशिवरात्री निमित्त मंदिरात दर्शनासाठी येणाऱ्या भाविकांना सात्विक उत्पादने उपलब्ध व्हावी तसेच राष्ट्र, धर्म यांसारख्या विषयावरील ग्रंथाचा लाभ व्हावा या उद्देशाने हे प्रदर्शन लावण्यात आले होते. या प्रदर्शनाला शहरातील अनेक प्रतिष्ठित आणि मान्यवरांची उपस्थिती लाभली तसेच भाविकांचा भरभरून प्रतिसाद मिळाला.

# बोर्डाची परीक्षा, जाच कुणाला ?

### परीक्षा मुलांची आहे, आई-वडीलांची नाही ; हे पालक विसरतात आणि घरात ताण वाढतो- डॉ.जगदीश टेकाळे



दहावीची बोर्डाची सुरु आहेत बारावीची सुरुच आहे. विविध प्रवेश परीक्षांचे वार्षिक परीक्षांचेही आता अगदी मोजके दिवस हातात राहिलेले असताना, अगदी शेवटी नेमकं काय करावं, हा यक्षप्रश्न मुलांनाही पडतो आणि त्यांच्या पालकांनाही छळतो. खरं सांगायचं तर परीक्षेचा अभ्यास ही सतत नियमाने करायची आहे तब्येत राहावी, म्हणून रोज व्यायाम करायला हवा अगदी तसंच!

एका दिवसात किंवा आठवड्यात तुम्ही मॅरेथॉन धावू शकत नाही किंवा कोणत्याही खेळाच्या स्पर्धेत भाग घेऊ शक नाही, तर त्यासाठी नियमितपणे बराच काळ प्रयत्न करायचे असतात. तसेच,तुमचाही अभ्यास वर्षभर नियमित झाला आहे, असे मसजून आता शेवटच्या काही दिवसांत मुलांना आणि त्यांच्या आई-वडिलांनाही उपयोगी पडणाऱ्या गोष्टी बघूयात...

**परीक्षेपूर्वी मुलांना काय काय करता येईल ?**

सर्वात महत्वाचा भाग म्हणजे आपला परीक्षेकडे बघण्याचा निकोप दृष्टिकोन, परीक्षा माझ्या आयुष्यात आलेला अडथळा/समस्या किंवा परीक्षेतील मार्क म्हणजे उत्तम आयुष्याची हमी,या दोन्ही विचारसरणींमुळे अनावश्यक ताण निर्माण होतो. मग अभ्यास केलेला असूनही परीक्षेत ब्लॅक होणं, खूप घाबरणं, आजारी पडणं,अशी लक्षणं दिसू लागतात. परीक्षा म्हणजे आपल्याला किती समजलंय आणि कशाचा अभ्यास किंवा सराव अजून करायला हवाय, एवढंच आपल्याला सांगणारी घटना आहे. परीक्षेतील मार्कांचा आणि आयुष्यातील आनंदाचा/यशाचा कोणताही सरळ संबंध नसतो.परंतु आपल्या देशातील शिक्षणपध्दतीमध्ये मार्कांवर करिअरची बरीचशी दिशा अवलंबून असते, त्यामुळे परीक्षेकडे वास्तववादी दृष्टिकोनातून बघणे खूप गरजेचे आहे. परीक्षेकडे संपूर्ण दुर्लक्ष किंवा परीक्षेचे अवडंबर करणे या दोन्ही गोष्टी टाळायला हव्यात.

**परीक्षेच्या काळात काय टाळावं ?**

आपल्या पूर्वी झालेल्या चुकांचा विचार करत बसणे, त्याचा अतिविचार करणे/भिती बाळगणे. विषयाची अतिचिंता करणे, अँडमिशनचा,कट ऑफचा विचार करणे, वर्षभरात जो भाग अभ्यासला नाही, त्याचा अचानक अभ्यास करणे, इतरांशी खूप चर्चा करणे, मित्रमंडळींशी वायफळ गप्पा/गॉसिप करणे, ग्रुपस्टडी करु नये.,वैयक्तिक अभ्यास अधिक उपयोगी पेपर लिहिताना मार्कांचा अंदाज घ्यायची घाई अजिबात नको., प्रत्येकाचे बायोक्लॉक/जैविक घड्याळ निरनिराळे असते. आदर्श टाईमटेबलच्या मागे लागून स्वतःला न जमणाऱ्या गोष्टी करु नये. जागरण किंवा खूप लवकर न उठताही दिवसभरात योग्य नियोजनाने अभ्यास करावा.

**काय काय तयारी करावी ?**

आदल्या दिवशी सर्व महत्वाचे साहित्य, हॉलतिकिट वगैरे सामान बॅगेत भरुन ठेवणे, आयत्या वेळी शोधाशोध केल्याने ताण वाढतो. संपूर्ण प्रश्नपत्रिका नीट, सावकास वाचणे, घाईने/वरवर वाचन नको. सिली मिस्टेक टाळण्या चा हा मार्ग आहे.,फक्त स्वतःच्या पेपरमध्ये लक्ष द्यावे.पेपर पूर्ण झाल्यावर तपासून बघायचा कंटाळा नको.,दीर्घश्वसन,डोळे बंद करुन स्वतःला सकारात्मक सूचना देणे.

**परीक्षा काळात काय करावं ?**

उत्तम,सकस,घरजे जेवन., पेपरच्या दिवशी सुध्दा केलेला माफक व्यायाम ८ तास रात्रभराची झोप, ताण निवारणासाठी केलेले थोड्या वेळाचे मनोरंजन, मानसिक शांती आणि एकाग्रतेसाठी ध्यान/योगनिद्रा/प्राणायाम (१० ते १५ मिनिटे रोज)

परीक्षा मुलांची आहे पालकांची नाही. त्यामुळे आई-वडीलांनी आपण अनावश्यक ताण घेतल्याने काहीच फायदा होत नाही. ऑफिसमधुन सुट्टी घेऊन दिवसभर घरात थांबुन मुलांमागे सतत अभ्यासाचा तकादा लावु नका.मुलांना त्यांचा आवडीचा छंद जोपासण्यासाठी प्रोत्साहन द्यावं.सुट्टी लागली की अमूक करु,तमूक करु अशी सुट्टी काळातली आवाजवी आश्वासने टाळा. परीक्षा देणे, अभ्यास करणे, करिअरचा विचार करणे ही मुलांची जबाबदारी आहे. अतिसूचना करणे,अनावश्यक सपोर्ट दिल्याने मुलं पालकांवर खूप अवलंबून राहतात आणि त्यांची निर्णयक्षमता,तसेच आत्मविश्वास कमी होतो. मुलांबरोबर संवाद सुरु ठेवा. त्यांचे म्हणणं ऐकून घ्या. त्यांच्यासोबत तुम्ही कायम आहात,यश/अपयश काहीही मिळाले, तरी तुमचा आधार त्यांना हे शब्दांतून,कृतीतुन जरु पोहचवा. परीक्षा आहे, म्हणून संपूर्ण घराल वेठीस धरु नका. अबोला , टोमणे, अतीसूचना नकोत. भावनिक चढ-उतार होतील असे प्रसंग/विषय जरुर टाळा असे मत डॉ.जगदीश श्रीराम टेकाळे एम.बी.बी.एस., एम.डी. मानसोपचार तज्ञ (गोल्ड मॅडॅलिस्ट)न्युरो सायकियाट्रिस्ट, व्यसनमुक्ती तज्ञ, सेक्सोलॉजीस्ट यांनी व्यक्त केले. डॉ.जगदीश टेकाळे महिन्याच्या दुसऱ्या व चौथ्या रविवारी बीड शहरात साई(गावते कॉम्प्लेक्स, डी.पी.रोड,डॉक्टर लाईन,बस स्टॅण्डच्या पाठीमागे येथे उपलब्ध असतात. मो.९५१८५५१५०३, ९५४५६१५३५२


## जाहीर प्रगटन

**श्री.जी.एस.खुपसे,२ रे सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर, माजलगांव जि.बीड यांचे न्यायालयात**

कि.दि.अर्ज नंबर ५४/२०२६ (मार्फत विधिज्ञ डी. जी. जाधव)

अशोक वि. निरंक

**अर्जदार :-** अशोक पि. एकनाथ डाके, वय ५२ वर्षे, धंदा-शेती, रा. सोन्नाथडी, पो. मोठीवाडी, ता. माजलगाव, जि.बीड

विरुध्द निरंक

प्रकरण - बॉम्बे रेग्युलेशन कायदा १८२७ चे कलम २ अन्वये वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत.

ज्याअर्थी नामे **गोदावरी भ्र. एकनाथ डाके,** हे/या दि. ०३/१२/२०२५ रोजी सोन्नाथडी, ता. माजलगाव जि.बीड येथे मयत झाले/झाल्या आणी त्यांचे वरीलप्रमाणे अर्जदार याने कायदेशीर वारस असलेबाबतचे वारस प्रमाणपत्र मिळणेचा अर्ज केला आहे.

अर्जदार / गैरअर्जदारा शिवाय मयताचे ईतर कोणीही वारस नाहीत असे अर्जदाराचे म्हणणे आहे. अर्जदार / गैरअर्जदारा असेही म्हणणे आहे की, शासकिय व निमशासकीय कार्यालयीन उपयोगा करीता वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे म्हणून सदरचा अर्ज या न्यायालयात दाखल केला आहे.

त्याअर्थी सर्व जनतेस कळविण्यांत येते की, सदरील अर्जदार / गैरअर्जदार हे मयताचे वारस नाहीत असे कोणास समजावयाचे असेल तर त्यांनी हे जाहिर प्रगटन प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसाच्या आत या न्यायालयात हजर होऊन आपली हरकत द्यावी. जर मुदतीत कोणीही हरकत न दिल्यास हे न्यायालय अर्जदाराचे हक्कात त्यांचा हक्का बाबतचा पुरावा घेऊन त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना मयताचे वारस असल्याबद्यलचे वारस प्रमाणपत्र दिले जाईल याची सर्वांनी नोंद घ्यावी. आज दिनांक-२०/०१/२०२६ रोजी न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

**पुढील तारीखः- ०२/०३/२०२६**

**आदेशावरून,**
**अधिक्षक**
**दिवाणी न्यायालय व.स्तर,माजलगांव**



## जाहीर प्रगटन

तमाम जनतेस खासकर मौजे वडगांवढोक ता. गेवराई जि. बीड येथील तमाम जनतेस या जाहीर प्रगटनाव्दारे सुचित करण्यात येते की, मौजे वडगांव ता. गेवराई जि. बीड येथील हद्दीतील मौजे वडगांव ढोक ता. गेवराई जि. बीड येथील जमीन ज्यीचा गट नंबर १९६ असून प्रकाश शिवनाथ बारगजे यांच्या मालकीचे क्षेत्र ०० हे. २३ आर. व संभाजी शिवनाथ बारगजे यांच्या मालकीचे क्षेत्र ०० हे. ४७ आर. जमीन असून त्यापैकी ०० हे. २९ आर. जमीन अशी एकुण क्षेत्र ०० हे. ५२ आर. जमीन ज्याची चतुःसीमा पुर्वेस लिहुन घेणार कैलास परमेश्वर मुदंडा व लिहुन देणार यांचा भारत पेट्रोल पंप, पश्चिमेस जुना बीड रस्ता, दक्षिणेस नाला व गणेश कदरे, उत्तरेस - सुदाम तुळशिराम बारगजे अशी असून सदर चतुःसीमेच्या आतील जमीन आमचे पक्षकार जाहीर प्रगटन देणार कैलास परमेश्वर मुंदडा रा. महेश कॉलनी गेवराई ता. गेवराई जि. बीड यांनी कायम खरेदीचा सौदा केला आहे. व तसा करारनामा आमचे पक्षकाराचे हक्कात प्रकाश शिवनाथ बारगजे व संभाजी शिवनाथ बारगजे यांनी करुन दिला आहे, तरी सदरील व्यवहारा संबंधी कोणास काही आक्षेप असल्यास त्याने सदरील आक्षेप आमचे पक्षकाराकडे कागदोपत्री पुराव्यासह १५ दिवसाचे आत येऊन लेखी स्वरुपात नोंदवावा. मुदत संपल्यानंतर आमचे पक्षकार हे वरील जमीनीचे मालकाकडून खरेदीखत करुन घेणार आहेत, व त्यानंतर कोणाचाही आक्षेप विचारात घेतला जाणार नाही याची नोंद घ्यावी. मुदतीत कोणाचाही आक्षेप न आल्यास, आमचे पक्षकार हे सदरील व्यवहार पुर्ण करतील व सदरील व्यवहार हा सर्व हितसंबंधावर बंधनकारक राहील. सबब हे जाहीर प्रगटन.

बीड
दि. १५/०२/२०२६

जाहीर प्रगटन देणार
**कैलास परमेश्वर मुंदडा**

मार्फत
**अॅड.वाय.एच.पाटील,गेवराई**
मो.क्र. ९४०४२५१०८७/९९७०२६५७५८


# हजारो भाविकांनी घेतले राजा हरिश्चंद्राचे दर्शन


**टि.सी.हरवला आहे**

**कु.शामल गोरख गवळी**
नावाचा इ.१२ वी पास चा टि.सी. डॉ.बाबासाहेब आंबेडकर पुतळा ते साठे चौक दरम्यान प्रवासात हरवला आहे. सापडल्यास संपर्क साधावा.
- संपर्क -
७०२०८५५३११


वडवणी (प्रतिनिधी) : भारतातील एकमेव राजा हरिश्चंद्र राजाचे मंदिर बीड जिल्ह्यात वडवणी तालुक्यातील हा पिंपरी येथे आहे. येथे महाशिवरात्री निमित्त बीड जिल्ह्यातील हजारो भाविक भक्तांनी राजा हरिश्चंद्राचे दर्शन घेतले.आज सोमवार दि १६ रोजी किर्तन महोत्सवाची राजा हरिश्चंद्र राजाचे मठाधिपदी श्री ह भ प भगवान महाराज राजपूत यांच्या काल्याच्या कीर्तनाने सांगता होणार आहे.

सविस्तर वृत्त असे की तालुक्यातील हरिश्चंद्र पिंपरी येथे सत्यवादी राजा हरिश्चंद्र राजाचे एकमेव मंदिर या ठिकाणी आहे.येथे विश्व मित्रांनी राजा हरिश्चंद्र राजाला स्वप्नात राज्य दान मागितले होते.व राजा हरिश्चंद्राने स्वप्नात दिलेले राज्य दान दिलेली भूमी आहे.भारतातील एकमेव राजा हरिश्चंद्र राजाचे मंदिर याच ठिकाणी आहे.येथे महाशिवरात्रीनिमित्त बीड जिल्ह्यासह महाराष्ट्रातील हजारो भावी भक्तांनी राजा हरिश्चंद्र राजाच्या रांगेत दर्शन घेतले.या महोत्सवात धार्मिक सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

या कीर्तन महोत्सवाची सांगता राजा हरिश्चंद्र मठाचे मठाधिपती श्री ह भ प भगवान महाराज राजपूत यांच्या काल्याचे किर्तन आणि होणार आहे. तरी या कीर्तनाचा व महाप्रसादाचा भाविक भक्तांनी लाभ घेण्याचे आवाहन राजा हरिश्चंद्र पठाचे मठाधिपती श्री हरिभक्त परायण महाराज राजपूती यांनी केले आहे.

## हरिनाम सप्ताहाची आज सांगता

मादळमोही दि १५ (प्रतिनिधी) -- गेवराई तालुक्यातील मौजे सावरगाव येथे सुरू असलेल्या महाशिवरात्रीनिमित्त आयोजित केलेल्या अखंड हरिनाम सप्ताहाची सांगता आज १६ फेब्रुवारी सोमवार रोजी श्री क्षेत्र भगवानगडाचे महंत न्यायाचार्य डॉक्टर नामदेव शास्त्री महाराज यांच्या काल्याच्या कीर्तनाने होणार आहे तरी पंचक्रोशीतील भाविक भक्तांनी ह्याचा लाभ घ्यावा अशी आव्हान गावकऱ्यांच्या वतीने करण्यात आले आहे.

# पार्श्वभूमी

## श्री नारायण मा.व उ.मा विद्यालयात संत सेवालाल जयंती साजरी

बीड दि.१५(प्रतिनिधी):- तालुक्यातील आहेर चिंचोली येथील श्री नारायण मा. व उ. मा. विद्यालयात श्री संत सेवालाल महाराज जयंती साजरी करण्यात आली. यावेळी कार्यक्रमाचे प्रमुख म्हणून श्री नारायण विद्यालयाचे संस्थापक अध्यक्ष महादेवराव काळे (अण्णा), संस्थेचे सचिव तथा प्राचार्यअमोल काळे सर उपस्थित होते. प्राचार्य तथा सचिव अमोल काळे सर यांनी संत सेवालाल महाराज यांच्या जीवन कार्याविषयी बहुमोल अशी माहिती दिली.

पान २ वर



## मुलांना चांगले संस्कार द्या, चांगली मुले घडवा-हभप शिवांजलीताई

गेवराई दि.१५ (प्रतिनिधी) :- आजच्या धावपळीच्या जीवनात केवळ भौतिक सुखाकडे न पाहता चारित्र्य, शिस्त, प्रामाणिकपणा आणि समाजभान हे मूल्य मुलांच्या मनात रुजवणे अत्यंत गरजेचे आहे. पालकांनी आपल्या मुलांवर केवळ शिक्षणापुरते नव्हे तर संस्कारांचे बीजही रुजवले पाहिजे. मुलांना चांगले संस्कार द्या, चांगली मुले घडवा, त्यांना चांगल्या मार्गाने चालायला शिकवा असे मत हभप शिवांजलीताई महाराज जरांगे यांनी व्यक्त केले. गेवराई तालुक्यातील बेलगुडवाडी येथील अखंड हरिनाम सप्ताहाच्या सहाव्या दिवशी झालेल्या कीर्तन सेवेप्रसंगी

त्या बोलत होत्या. यावेळी त्यांनी प्रभावी आणि प्रेरणादायी विचार मांडले. पुढे बोलताना त्यांनी सांगितले की, मुलांना छत्रपती शिवाजी महाराज, संत तुकाराम महाराज आणि संत ज्ञानेश्वर महाराज यांचे विचार द्या, ते नक्कीच यशस्वी झाल्याशिवाय राहणार नाहीत. छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जीवनातील अनेक प्रसंग सांगत त्यांनी त्यांच्या शौर्याचे, धैर्याचे आणि प्रजाहितदक्षतेचे दाखले दिले. शिवरायांनी केवळ स्वराज्य निर्माण केले नाही तर उत्तम प्रशासन, स्त्रियांचा सन्मान, शत्रूशीही माणूसकीने वागणे हे आदर्श समाजापुढे ठेवले असे त्या म्हणाल्या. तसेच संत नामदेव महाराज यांच्या अभंगांचा दाखला देत त्यांनी भक्ती, साधेपणा आणि आत्मशुद्धीचे महत्त्व विशद केले. संत ज्ञानेश्वर महाराजांच्या विचारांवर बोलताना त्यांनी 'ज्ञानेश्वरी'तील तत्वज्ञान समाज जीवनासाठी किती

पान २ वर

## महाशिवरात्रीनिमित्त शिवालय मंदिरात दर्शनासाठी भाविकांची गर्दी




माजलगांव दि.१५(प्रतिनिधी):-महाशिवरात्री निमित्त शिवालय मंदिरामध्ये भाविक भक्तांनी दर्शनासाठी गर्दी केली होती तसेच माजलगाव शहरासह तालुक्यातही भाविक भक्तांनी शिवालय मंदिरामध्ये दर्शनासाठी भाविकांनी मोठ्या गर्दीत दर्शनाचा लाभ घेतला आहे. महाशिवरात्रीनिमित्त मंगलनाथ मंदिरामध्ये शिव महापुराण कथा चालू आहे आणि महाशिवरात्रीनिमित्त मंगलनाथ मंदिर माजलगावचे ग्रामदैवत श्री सिद्धेश्वर मंदिरात काळूराम मंदिरात ओंकारेश्वर मंदिर केदारेश्वर नागेश्वर केसापुरी केशव राजा मंदिरात शुक्ल तीर्थ लिमगाव येथील शुक्लेश्वर मंदिरात सादोळा

पान २ वर

## स्व.मच्छिंद्र गायकवाड प्रतिष्ठानच्या वतीने महाशिवरात्री निमित्त अन्नदान

बीड दि.१५ (प्रतीनीधी):- सामाजिक सलोखा राखत स्व.मच्छिंद्रदादा गायकवाड प्रतिष्ठान तर्फे तुळजाभवानी मंदिर येथे शिवकथा सप्ताह अन्नदान यासह गेल्या तीन वर्षांपासून श्री कँकालेश्वर मंदिर येथे सामाजिक कार्याचा रथ चालुच आहे. आज महाशिवरात्रीचा योग व स्व.मच्छिंद्रदादा साहेबराव गायकवाड यांच्या तिसऱ्या पुण्यस्मरणानिमित्त कँकालेश्वर येथील सभागृहात भाविक भक्त यांच्यासाठी भव्य खिचडी व फळ महाप्रसाद ठेवण्यात आला. तसेच भव्य रक्तदान शिबीराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबीरात



२८ दात्यांनी रक्तदान केले. या प्रसंगी दयानंद मच्छिंद्र गायकवाड, विजय मच्छिंद्र गायकवाड, सचिनभाऊ शहागडकर, अतुल मदन गायकवाड, आदित्य संतोष माने नगरसेवक पियु संतोष माने, संतोष मोरे, संतोष सोनटक्के

पान २ वर

## आ.धस यांच्या सूचनेनंतर यादवकालीन संगमेश्वर मंदिर पुनर्निर्माणाला गती

पाटोदा दि.१५(महेश बेदरे):-पाटोद्यातील तेराव्या शतकातील यादवकालीन पुरातन संगमेश्वर महादेव मंदिराच्या पुनर्निर्माण कामाला अखेर गती मिळाली असून, आमदार सुरेश धस यांच्या स्पष्ट सूचनांनंतर संबंधित यंत्रणा सक्रिय झाल्याचे चित्र दिसत आहे. सहा वर्षांपूर्वी १५ ऑक्टोबर २०२० रोजी मध्यरात्री मंदिराचे शिखर कोसळल्याने शहरात मोठी खळबळ उडाली होती. हजारो भाविकांच्या श्रद्धास्थानाला तडा गेल्याने नागरिकांमध्ये तीव्र भावना व्यक्त होत होत्या. शिलालेख, स्थापत्यशैली तसेच मंदिरातील प्राचीन घंटावरील उल्लेखावरून हे



मंदिर यादवकालीन व साधारणतः १३व्या शतकातील असल्याचे मानले जाते. त्यामुळे या मंदिराचे ऐतिहासिक व सांस्कृतिक महत्त्व अधिक अधोरेखित झाले आहे.

पान २ वर



बीड -अ.भा.छावा चे बीड जिल्हाध्यक्ष अशोक अण्णा रोमन यांना वाढदिवसानिमित्त शाल, श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन पेढा भरवतांना महाराष्ट्र राज्याचे मा.आरोग्यमंत्री आ.प्रा.डॉ.तानाजीराव सावंत सोबत अ.भा.छावा चे संभाजीनगर जिल्हाध्यक्ष अशोक मोरे पाटील, गोविंद जाधव(सरपंच), मिट्टन कोटुळे पाटील, पप्पू लांडे पाटील, दत्ता काशीद, गणेश जाधव, पप्पू शिंदे पाटील, अभिजीत मस्कर बाळासाहेब काशीद, पप्पू मस्के पाटील, अंकुश खडके पाटील, सतीश काळे पाटील, सतीश क्षीरसागर, अविनाश पवार, गजानन पवार संभाजीनगर, बाळू सुर्वे पाटील, गिरीश करवा व इतर छावा मित्रपरिवार

## आष्टीत महाशिवरात्री निमित्त तीन दिवसीय महोत्सव उत्साहात

### आ.धस यांनी भक्तांच्या रांगेत उभं राहून घेतले पिंपळेश्वरांचे दर्शन

आष्टी (प्रतिनिधी) :- श्री क्षेत्र पिंपळेश्वर महादेव देवस्थान मंदिरात महाशिवरात्री उत्सवानिमित्त तीन दिवसीय महोत्सव मोठ्या भक्तिभावाने आणि उत्साहात पार पडला. या महोत्सवाचे आयोजन श्री पिंपळेश्वर महादेव देवस्थान ट्रस्ट, श्री पिंपळेश्वर देवस्थान समिती आष्टी तसेच समस्त ग्रामस्थ आष्टी मुर्शदपुर यांच्या वतीने करण्यात आले होते.

उत्सव काळात दररोज अभिषेक, महाआरती व दैनंदिन महाआरतीचे आयोजन करण्यात आले. तसेच कीर्तन केसरी ह भ प ज्ञानेश्वर महाराज कोठुळे भिवंडीकर यांचे प्रभावी कीर्तन पार पडले. त्यांच्या कीर्तनातून उपस्थित भाविकांना अध्यात्मिक मार्गदर्शन लाभले. उत्सवाची सांगता भव्य शोभायात्रेने झाली. या शोभायात्रेत सुमारे अडीचशे वारकरी मुला-मुलींच्या टाळ-मृदंग भजनी मंडळ पथकाने सहभाग घेतला



होता. 'हर हर महादेव'च्या जयघोषात संपूर्ण परिसर दुमदुमून गेला होता. मराठवाडा भूषण लोकनेते सुरेश धस यांनी मंदिरात उपस्थित राहून पिंपळेश्वरांचे दर्शन घेतले व भाविकांशी

पान २ वर

## कोठारी प्रतिष्ठानकडून पद्मश्री डॉ.तात्याराव लहाने यांचा वाढदिवस




जामखेड दि १५(प्रतिनिधी)- जगविख्यात नेत्रतज्ञ पद्मश्री डॉ. तात्याराव लहाने हे शनिवार १४ फेब्रुवारी जामखेड येथे आले असता कोठारी प्रतिष्ठानचे संजय कोठारी आणि अमोल ताथेड यांच्यामार्फत जामखेड येथील बीड रोड वरील हॉटेल सैराट येथे त्यांचा वाढदिवस साजरा करण्यात आला. यावेळी प्रवीण शिलवंत, संकेत कोठारी, बंडूशेठ म्हैत्रे, संजय गांधी, पवन कांकरिया , मिथुन बाफना, दीपकशेठ टेकाळे, गणेश भळगट, उमेश घुगे सर, रोहन कोठारी, विनीत गुंदेचा तसेच महिला मंडळ आदी उपस्थित होते. यावेळी बोलताना डॉ. तात्याराव लहाने यांनी सध्याची परिस्थिती पाहता डोळ्याचे विकार वाढत

पान २ वर

## तरुण पिढीसाठी भवानीगड आदर्श ठरावा-आ.पंडित

गेवराई दि.१५(प्रतिनिधी):-अखंडानंदगिरी महाराज (दादाजी)भवानीगडकर यांनी गेल्या काही वर्षापासून महाशिवरात्री निमित्त सामूहिक दिव्य शिवपूजन सोहळा व एक दिवसीय कीर्तन महोत्सव या ठिकाणी सुरू केलेला आहे.हा गड तरुण पिढीसाठी आदर्श असा आहे.या ठिकाणी तरुणांच्या उज्वल भविष्यासाठी व गडाच्या सर्वांगीण विकासासाठी उपमुख्यमंत्री तथा बीडच्या पालकमंत्री सुनित्राताई साहेब पवार यांच्या माध्यमातून या ठिकाणी विकास निधी उपलब्ध करून देऊ,असे प्रतिपादन आ.विजयराजे पंडित यांनी केले आहे. पुढे बोलताना ते म्हणाले की, अखंडानंदागिरी महाराज भवानीगड यांच्या माध्यमातून त्या ठिकाणी सांप्रदायिक प्रशिक्षण दिले जाते आणि आणि तरुण पिढीसाठी वारकरी संप्रदाय काळाची गरज आहे.आजकाल तरुण पिढीही मोबाईल मध्ये गुरुफटलेली दिसत आहे.त्या मोबाईलचा वापर चांगला होत नसून तरुण पिढी अधोगतीकडे चाललेली असताना,

पान २ वर



## भूमि अभिलेख कर्मचाऱ्यांचे असहकार आंदोलन पूर्व तयारीसाठी बैठक संपन्न

बीड दि.१५(प्रतिनिधी):- महाराष्ट्रातील सर्व भूमि अभिलेख कर्मचाऱ्यांचे मागणी संदर्भात राज्यभरात असहकार आंदोलन पूर्व तयारीसाठी बीड जिल्हा भूमि अभिलेख कर्मचारी संघटनेची बैठक उत्सहात व जिल्हा भरातून मोठया संख्याने कर्मचारी चे उपस्थित पार पडली.... भूमि अभिलेख विभागातील कर्मचाऱ्यांचे प्रलंबित मागण्यावर राज्यभरातील सर्व संघटना मिळून भूमी अभिलेख कर्मचारी कृती समिती महाराष्ट्र राज्य स्थापन झाले असून या संघटनेमार्फत सनद शिर लढा देण्याचा ठाम निर्धार घेत आहे. तरी लढायची रोपरेषा ठरवण्यासाठी आज रोजी बीड जिल्हा भूमी अभिलेख कर्मचारी यांच्या वतीने आंदोलनाच्या पूर्वतयारीसाठी आढावा बैठक उत्साहात संपन्न झाली खालील प्रमाणे आंदोलनाच्या रूपरेषा ठरवण्यात आली आहे.दि. १८ ते २० फेब्रुवारी २०२६ रोजी कार्यालयात साहित्य जमा करणे व काळेफिती लावून फक्त कार्यालयीन कामकाज करणे.दि.२३ ते २६ फेब्रुवारी या काळात सामूहिक रजा आंदोलन करणे.दि. २७ फेब्रुवारी रोजी माजमाबंदी आयुक्त पुणे कार्यालयावर

पान २ वर

## उखंडा गावात कवठेकर यांच्या हस्ते दहा लाखांच्या रस्ता कामाचे भूमिपूजन



पाटोदा (प्रतिनिधी) :-उखंडा ता. पाटोदा येथील ग्रामस्थांसाठी अत्यंत महत्त्वपूर्ण ठरणाऱ्या दहा लाख रुपयांच्या रस्ता कामाचे भूमिपूजन उत्साहपूर्ण वातावरणात पार पडले. आमदार निधीतून मंजूर करण्यात आलेल्या या कामाचा शुभारंभ लोकनेते मराठवाडा भूषण तथा आष्टी-पाटोदा-शिरूरचे लोकप्रिय आमदार मा. सुरेश धस यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्हा परिषदेचे माजी सदस्य ड. प्रकाश (दादा) कवठेकर यांच्या हस्ते करण्यात आला. गेल्या अनेक वर्षांपासून उखंडा गावातील नागरिकांना रस्त्याच्या समस्येला सामोरे जावे लागत होते. पावसाळ्यात चिखल व खड्ड्यांमुळे वाहनचालकांसह शेतकरी, विद्यार्थी आणि महिलांना मोठा त्रास सहन करावा लागत होता. ग्रामस्थांनी वेळोवेळी ही समस्या लोकप्रतिनिधींसमोर मांडली होती. या पार्श्वभूमीवर आमदार सुरेश धस यांनी तात्काळ दखल घेत आमदार निधीतून दहा लाख रुपयांची तरतूद करून रस्ता कामाला मंजुरी दिली.भूमिपूजन प्रसंगी

पान २ वर

## बीडचा सार्वजनिक जयभीम महोत्सव डीजेमुक्त साजरा होणार

### पहिल्या बैठकीत समाजातून जमा झाले ७ लाख रुपये

बीड दि.१५(प्रतिनिधी):- संविधान निर्माते महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती बहुतांश देशात साजरी होते. त्या अनुषंगाने राज्यात बीडच्या सार्वजनिक जयभीम महोत्सवाने देखील स्वबळावरची एक आदर्श जयंती म्हणून लौकिक मिळविला आहे. तसेच यंदाचा जयभीम महोत्सव हा डीजेमुक्त साजरा होणार असून पहिल्याच बैठकीत तब्बल ७ लाख रुपये वर्गणी समाजातून जमा झाली



आहे. विशेषतः म्हणजे यावर्षीचा हा जयभीम महोत्सव युवकांच्या हाती देण्यात आला आहे.त्यामुळे याहीवर्षी आगळीवेगळी जयंती साजरी करण्यासाठी डॉ.बाबासाहेब आंबेडकर सार्वजनिक जयंती उत्सव समिती आत्तापासूनच जय्यत तयारीला लागली आहे. डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३५ व्या जयंती निमित्ताने बीड शहरातील सामाजिक न्याय भवन येथे शनिवार (ता.१४) फेब्रुवारी रोजी युवा

पान २ वर

## गेवराईस स्मार्ट मीटरचा बोजवारा चार-चार महिने रिडिंग येईना

मादळमोही दि १५ (प्रतिनिधी):-महावितरण कंपनीकडून राज्यातील घरगुती वीज ग्राहकासाठी स्मार्ट टीओडी अर्थात टाइम ऑफ डे मीटर च्या माध्यमातून दिवसाच्या मीटर वापरामध्ये प्रति युनिट ८० पैसे ते एक रुपया सवलत दिली जाते यामध्ये बीड जिल्ह्यासह गेवराई तालुक्यात ग्रामीण सह शहरात मोठ्या प्रमाणात मीटर बसवण्यात आली आहेत. महावितरण कडून याविषयी अचूक रीडिंग मिळते. एवढंच काय तर ग्राहकाला तासा तासाला अचूक रीडिंग पाहता येते असे गेवराई शहराचे अभियंता मोठमोठ्या बढाया मारत आहेत परंतु गेवराई शहरात स्मार्ट मीटरची रीडिंग तासा तासाला सोडाच चार चार महिने झाले तरी येत नसल्याने हे फक्त सांगण्यासाठीच असल्याचे दिसून येत आहे.

महावितरण कंपनीकडून राज्यासह बीड जिल्ह्यात व गेवराई शहरात स्मार्ट मीटर बसवण्यात आले आहेत परंतु कित्येक ग्राहकांना चार महिने झाले तरी अचूक रीडिंग मिळत नसून अंदाजे हजारो रुपयाचे फक्त मेसेज येत आहेत याची चौकशी कर्मचाऱ्याकडे केली असता वाट पहा एवढेच उत्तर मिळत आहे तर शहर अभियंता आलेले अंदाजे बिल भरणा करा नसता वीज पुरवठा खंडित करू असा धमकी वजा इशारा देतात त्यामुळे गेवराई शहरातील या अभियंत्याची वरिष्ठांनी कान उघाडणी करावी अशी मागणी वीज ग्राहकांमधून मोठ्या प्रमाणात करण्यात येत आहे.

## डॉ.स्वामीनाथन राज्यस्तरीय कृषी प्रदर्शनाचा लाभ घ्यावा-



आष्टी(प्रतिनिधी):- आष्टी येथे वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठ परभणी, अंतर्गत आनंद चॅरिटेबल संस्था संचलित, श्री छत्रपती शाहू फुले आंबेडकर कृषी महाविद्यालय, यांच्या वतीने तसेच शेतकऱ्यांचे नेते आ.भीमराव धोंडे व युवकांचे प्रेरणास्थान डॉ.अजय दादा धोंडे यांच्या संकल्पनेतून दि. १९ फेब्रुवारी ते,२३ फेब्रुवारी २०२६, या कालावधीमध्ये मराठवाड्यातील सर्वात मोठे डॉ. स्वामीनाथन राज्यस्तरीय तिसरी कृषी प्रदर्शन आष्टी भव्य स्वरूपात आयोजित करण्यात

पान २ वर

## पाटोदा येथील राज मोहम्मद चौकातील वाहतुक कोंडीचे नियोजन करा-अॅड.मस्के



पाटोदा दि.१५ (प्रतिनिधि) - पाटोदा शहरातील राज मोहम्मद चौक हा रहदारीचा चौक असुन १) पारगांव रोड, २) महासांगवी रोड, ३) बीड, मांजरसुंबा मार्गे येणारा मुख्य रोड, ४) पाटोदा शहराचे बाजारतळातुन येणारा मुख्य रोड असे प्रमुख रस्ते या चौकात येऊन मिळतात. जामखेड ते सौताडा मार्गे चुंबळीफाटा या राष्ट्रीय महामार्गाचे काम सद्यस्थितीत चालु असल्याने बीड व मांजरसुंबा मार्गे जामखेड कडे येणारी व जाणारी बरीचशी वाहने ही या चौकातुन जात आहेत. त्यामुळे या चौकात वाहतुकीची कोंडी होताना दिसत असुन यामुळे जीवीत हानी होण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे योग्य ते नियोजन करून राज मोहम्मद चौक येथील वाहतुक नियंत्रणात ठेवुन जिवीत हानी टाळली जावी या करीता भारतीय राष्ट्रीय काँग्रेस पक्षाचे बीड जिल्हा चिटणीस अॅड. विशाल मस्के यांनी पोलिस स्टेशन पाटोदा व नगर पंचायत पाटोदा यांना निवेदन दिले आहे, त्यावेळी भारतीय राष्ट्रीय काँग्रेस पक्षाचे पाटोदा तालुका अध्यक्ष राहुल जाधव, पत्रकार हमीदखान पठाण व इतर कार्यकर्ते उपस्थित होते.

## एलएलबी सीईटी नोंदणीस १५ मार्चपर्यंत मुदतवाढ- डॉ.तांदळे

बीड (प्रतिनिधी):-राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षातर्फे शैक्षणिक वर्ष २०२६- २७ साठी एलएलबी (५ वर्ष) अभ्यास क्रमांच्या प्रवेश नोंदणीला १५ मार्च २०२६ मुदतवाढ देण्यात आली आहे. १४ फेब्रुवारी २०२६ शनिवार पर्यंत या अभ्यास क्रमास २६ हजार ६१ विद्यार्थ्यांनी नोंदणी केली आहे. तर या अभ्यास क्रमाची प्रवेश परीक्षा ८ मे २०२६ रोजी होणार आहे. गेल्या वर्षी या प्रवेश परीक्षेमध्ये ३५ हजार ७४ विद्यार्थिनी नोंदणी केली होती. या अभ्यासक्रमांसाठीचा ऑनलाईन अर्ज, सविस्तर माहिती पुस्तिका कक्षाच्या अधिकृत संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात आली आहे. तरी इच्छुक विद्यार्थ्यांनी अधिक माहितीसाठी राज्य सामायिक प्रवेश परीक्षा कक्षाच्या संकेतस्थळावर संपर्क साधून एलएलबी (५ वर्ष ) अभ्यासक्रमा साठी सीईटी नोंदणी १५ मार्च २०२६ रविवार पर्यंत करण्याचे आवाहन शिक्षण व करियर कौन्सिलर डॉ. संजय तांदळे यांनी केले आहे.

CMYK